# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

----------------------------------------

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २९, १९४५ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) वने मंत्री** } **यांचे प्रभारी विभाग**

----------------------------------------
**प्रश्नांची एकूण संख्या - ६१**
----------------------------------------

### संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश करण्याबाबत

**(१) * २२१९१ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हजारो ऊसतोड कामगार दरवर्षी पश्चिम महाराष्ट्राकडे स्थलांतरित होतात ही वस्तुस्थिती असताना देखील केवळ समाज कल्याण विभागाच्या नाकर्तेपणामुळे लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या अंतर्गत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश न झाल्याने हजार ऊसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊसतोड कामगारांच्या मुलांना वसतिगृहात राहून उच्च शिक्षण घेता यावे यासाठी लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळाने यंदापासून जालना आणि बीड जिल्ह्यात वसतिगृहे सुरू करण्याची प्रक्रिया सुरू केली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा यात समावेश न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील १९१ गावांतील १९७९ कुटुंबे मागील वर्षी कोल्हापूर जिल्ह्यातील ११ साखर कारखान्यांकडे ऊस तोडणीसाठी गेली असता त्यांच्यासोबत ० ते १८ वयोगटातील १९०३ मुले असून त्यांचे पालक ऊसतोड करीत असताना ऊसाच्या फडात झोपलेली आढळून आली ही वस्तुस्थिती कोल्हापूर येथील अवनी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने बीडसह राज्यातील इतर जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांचे स्थंलातरण रोखण्याबाबत तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या अंतर्गत संत भगवान बाबा शासकीय वसतिगृह योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १५/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात एकूण ८२ वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जिल्ह्यातील एकूण ६ वसतिगृहांचा समावेश आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात बीड, जालना, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी प्रत्येक १०० क्षमतेची एकूण २० शासकीय वसतिगृहांपैकी मुलांसाठी ८ व मुलींसाठी ९ अशी एकूण १७ वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) अवनी संस्था कोल्हापूर ही मुलांच्या अधिकाराबाबत कार्य करते. ऊसतोड कामगारांच्य ७ ते १४ वयोगटातील बालकांना शिक्षण हक्क अंतर्गत शाळेत प्रवेश देण्याबाबत त्यांनी प्रादेशिक सहसंचालक साखर तथा सहनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर व जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना अनुक्रमे दिनाक २४/११/२०२३ व दिनांक १८/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि, कोल्हापूर विभागातील साखर कारखान्यामार्फत ऊसतोड कामगारांच्या बालकांना कारखाना कार्यक्षेत्रात असलेल्या शाळेत दाखल करून त्यांना शिक्षण देण्यात येते सदर बालकांना ऊसतोड हंगामामध्ये हंगामी साखर शाळा सुरू करण्यात येऊन मानधन तत्वावर शिक्षकांची नियुक्ती केली जाते. तसेच बालकांना प्रोत्साहनपर शालेय आहार/मध्यान्ह भोजन, बिस्कीटे व गणवेश पुरविला जातो. शालेय शिक्षण विभागाकडून स्थलांतरित मुलांचे शिक्षण नियमित शाळेमध्ये त्यांच्या मूळ ठिकाणी व्हावे याकरीता हंगामी वसतिगृह, नातेवाईकाकडे राहणाऱ्या मुलांना सकाळच्या नाश्त्याची, रात्रीच्या जेवणाची सोय, खाजगी व्यवस्थापनाच्या शाळामंधून स्थलांतरीत होणाऱ्या बालकांनाही त्या गावातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमार्फत लाभ उपलब्ध करून देण्याची सुविधा आहे. काही कारणास्तव बालकांचे स्थलांतर झाल्यास स्थलांतर कालावधी संपल्यानंतर पालक बालकांसह मूळ गावी आल्यानंतर शेवटचे स्थलांतर झालेल्या कार्यक्षेत्रातील शाळेकडून प्राप्त झालेल्या शिक्षण हमी पत्रकानुसार बालकास मूळ गावातील शाळेत प्रवेश देण्यात येतो. बीडसह राज्यातील इतर जिल्ह्यातील ऊसतोड मजूरांच्या मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी व कारखान्यावरील ऊसतोड मजूरांच्या बालकांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी "संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आलेली आहे. जागेची उपलब्धता, ऊसतोड कामगारांची संख्या, निधीची उपलब्धता व लोकप्रतिनिधींची मागणी यानुसार उर्वरीत ठीकाणी वसतिगृहे सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(२) * २१९३२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेने नायगांव डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी रुपये ४५ कोटींच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मंजूरी देऊन त्यासाठी बायोमायनिंग प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात त्यासाठी जागा निश्चित करुन औद्योगिक वसाहतीमध्ये १९ भूखंड आरक्षित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामास वेळ लागत असल्याने व डम्पिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यासाठी जागा नसल्याने डम्पिंग ग्राऊंडवर वाहनाच्या लांबच लांब रांगा लागत असून प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत बायोमायनिंग बायोगॅस प्रकल्प पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

स्वच्छ भारत मिशन १.० अंतर्गत अकोला शहर घनकचरा व्यवस्थापनास दिनांक ३०/०१/२०२१ रोजी रुपये ४५.३५ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून दिनांक २२/०९/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. या प्रकल्पास नायगांव डंपिंग ग्राऊंडवरील कचऱ्याचे विल्हेवाट लावण्यासाठी ०८.०६ कोटी रुपयाची तरतुद शासनामार्फत करण्यात आली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे,

अल्पकाळासाठी नायगांव डंपिंग ग्राऊंडवर वाहनांच्या रांगा (दोन तास) लागल्या होत्या. तथापि, महानगरपालिकेव्दारे सदर समस्या तात्काळ निकाली काढण्यात आलेली आहे.

(४) महानगरपालिकेद्वारे शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक बायोगॅस प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, ट्रान्सफर स्टेशन, वाहनखरेदी इत्यादी बाबी पूर्ण करण्यात आल्या आहे. BS-VI OBD-२ Refuse Compactor बाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. दिनांक ३/१०/२०२३ रोजी या प्रकल्पाकरीता दुसऱ्या टप्प्याचा रुपये १३.२३ कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून ३ जेसिबी, ३ ट्रॅक्टर, इत्यादी करीता निविदा प्रसिध्द करून पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(५) निधी उपलब्ध असूनही वेळेत Compactor खरेदी न केल्यामुळे उद्भवलेल्या समस्येकरीता संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे व विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे वारणाली मल्टी स्पेशालिटी रुग्णालय विविध अत्याधुनिक सोयी-सुविधांसह कार्यान्वित करण्याबाबत

**(३) * २१३८१ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवा सुविधेत सद्य:स्थितीत १० शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ६ ॲलोपॅथिक रुग्णालये, एक डायग्नोस्टिक सेंटर, एक आयुर्वेदिक रुग्णालय, एक आपला दवाखाना अशी एकूण १८ रुग्णालये कार्यरत आहेत परंतु, सदर सर्व रुग्णालये बाह्यरुग्ण विभाग स्वरूपात आहेत, आंतरुग्ण विभाग असलेले एकही रुग्णालय नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली येथील वारणाली मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून, सदर रुग्णालयात वैद्यकीय उपकरणे, फर्निचर, विद्युत जोडणी इत्यादी कामे गत सहा महिन्यांपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात महानगरपालिकेची आंतरुग्ण विभाग असलेली रुग्णालये सुरु करुन सांगली येथील महानगरपालिकेचे वारणाली मल्टी स्पेशलिटी रुग्णालय कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे ६ ॲलोपॅथिक, २ कुटुंब कल्याण केंद्रे, २ प्रसुतीगृहे व १ आयुर्वेदिक दवाखाना असून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १० प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. यापैकी प्रसुतीगृहांमधून गरोदर मातांना आंतरुग्ण सेवा देण्यात येत असून इतर रुग्णांकरीता आंतरुग्ण विभाग असलेले रुग्णालय नाही. तथापि, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या पद्मभुषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथे आंतररुग्ण सेवेसाठी रुग्ण संदर्भित करण्यात येतात.

(२) व (३) वारणाली मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाच्या वाढीव कामाकरीता महानगरपालिकेने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०२४-२५ च्या कृती आराखड्यामध्ये रुपये ३ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. सदर निधी प्राप्त करुन घेण्यासाठी महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील समृध्दी महामार्गावर प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे झालेल्या अपघाताची चौकशी करणेबाबत

**(४) * २२०४५ श्री.महादेव जानकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अंबादास दानवे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील जांबरगाव टोल नाक्याजवळ समृध्दी महामार्गावर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ट्रक व ट्रॅव्हल्सच्या अपघातामध्ये १२ नागरिकांचा मृत्यू व २३ जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समृध्दी महामार्गावर मागील दहा महिन्यांमध्ये १२८१ गाड्यांचे अपघात झाले असून त्यामध्ये १२३ नागरिकांचा मृत्यू झाला आहे, समृध्दी महामार्गावर ताशी १२० किलोमीटरची वेगमर्यादा असताना वाहतूक पोलिसांनी ट्रक थांबविण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे २३ नागरिकांचा मृत्यू झाल्याने त्याची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली तसेच समृध्दी महामार्गावरील अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर अपघातामध्ये १३ प्रवासी मृत व २२ प्रवासी जखमी झाले आहेत.

(२) व (३) दिनांक ११/१२/२०२२ ते दिनांक ३१/१०/२०२३ या कालावधीत समृध्दी महामार्गावर एकूण १०४० अपघात झालेले असून त्यामध्ये प्राणांतिक अपघात ६४ असून त्यामध्ये १३२ जणांचा मृत्यू झालेला आहे.

या प्रकरणी दोन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांना दिनांक १५/१०/२०२३ रोजी सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांचे विरुध्द भा.द.सं. अंतर्गत ३०४(२), ३०८,३३७,३३८,३४ व ४२७ नुसार गुन्हा नोंदविलेला आहे. माहे एप्रिल, २०२३ मध्ये रस्ता सुरक्षा विषयांतर्गत समृध्दी महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी टायर तपासणी, नो पार्किंग, रिफ्लेक्टर नसलेली वाहने, लेन कटींग, ओव्हर स्पीड तसेच माहे जुलै, २०२३ पासून ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह, इ. विशिष्ट कारवाईसाठी आदेश दिले होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील रुग्णांचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(५) * २१९५८ अ‍ॅड.अनिल परब, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी २४ तासात झालेल्या १८ मृत्यूंच्या घटनेने राज्यातील वैद्यकीय व आरोग्य यंत्रणेतील त्रुटी निदर्शनास येऊ लागल्या असून सदर प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय, सादर केलेल्या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,
(२) असल्यास, नांदेड तसेच छत्रपती संभाजीनगर येथे असलेल्या शासकीय रुग्णालयातही दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी १८ रुग्णांचा उपचाराअभावी मृत्यू झाला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका रुग्णालयात डॉक्टर्स, परिचारिका तसेच कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त असून औषधे, वैद्यकीय यंत्रणांचा तुटवडा इ.बाबींमुळे रुग्णांना सेवा मिळण्यात समस्या निर्माण होत असून या समस्या रुग्णांच्या मृत्यूचे कारण बनत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात इमारतीच्या छताचा काही भाग कोसळून रुग्णालयातील कर्मचारी जखमी झाल्याची घटना दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यात आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी अद्ययावत रुग्णाालये उभारणे, रिक्त पदे तातडीने भरणे तसेच अत्याधुनिक आरोग्य यंत्रसामग्री रुग्णालयांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच संबंधित दुर्घटनाप्रकरणी मृत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना तात्काळ मदत मिळण्याबाबत शासन कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक १२/०८/२०२३ रोजी रात्री १०.३० वा. ते दिनांक १३/०८/२०२३ सकाळी ८.३० या कालावधीत ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथील १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर नियुक्त करण्यात आलेल्या आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीचा गोपनीय अहवाल शासनास प्राप्त झाला असून उपरोक्त अहवालावर शासन स्तरावर सद्य:स्थितीत कार्यवाही सुरू आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

डॉ.शंकरराव चव्हाण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ७ व छत्रपती संभाजीनगर येथे १० रुग्णांचा मृत्यू झाला असून यापैकी कोणत्याही रुग्णाचा मृत्यू उपचाराअभावी झाला नसल्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने कळविले आहे.
(३) राज्यातील महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवेशी निगडीत अत्यावश्यक पदे तातडीने भरण्याबाबत तसेच औषध पुरवठा नियमितरित्या उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना महानगरपालिकेच्या आयुक्तांना देण्यात येत आहे.
(४) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिनांक १५/१०/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या छताच्या प्लॅस्टरचे काही भाग कोसळला असून एका कर्मचाऱ्यास किरकोळ दुखापत झाली आहे.
(५) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयातील रुग्ण सेवेची निकड, लोकसंख्या तपासून वेळोवेळी श्रेणीवर्धन करण्यात येते. तसेच रुग्णालयांसाठी अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे.

त्याचप्रमाणे वैद्यकीय शिक्षण व औषधेद्रव्ये विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालयांना संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्यामार्फत पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्यामुळे रुग्ण सेवेमध्ये कोणतीही अडचण निर्माण होत नसल्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधेद्रव्ये विभागाने कळविले आहे.

-----------------

## अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील साईनगर परिसरात नाटयगृह बांधण्याबाबत

**(६)** * **२१७१० श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १९ अंतर्गत साईनगर परिसरात गत काही वर्षांच्या कालावधीत २ हजार गाळे असणाऱ्या म्हाडा वसाहती निर्माण झाल्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत मनोरंजनाच्या साधनांची उपलब्धता नसल्याने या ठिकाणी नाटयगृह बांधण्याची मागणी आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत तसेच पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरहू नाट्यगृहाच्या बांधकामाकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच निधी उपलब्धतेसह किती कालावधीत सदर काम होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी अमरावती महानगरपालिका क्षेत्रात नाट्यगृह बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय. अमरावती महानगरपालिका निधीमधुन नाट्यगृहाचे बांधकाम करुन देणे बाबत मा.विधानपरिषद सदस्य श्री.श्रीकांत भारतीय यांचे दिनांक २०/०४/२०२३ चे पत्र क्र.५४/२०२३ अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(२) व (३) महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय क्र.नागृबा-२०१५/ प्र.क्र. ८५/सां.का.१, दिनांक २९/०२/२०१६ अन्वये महानगरपालिकेकरीता अंदाजे ९०० ते १००० आसन क्षमतेच्या नाट्यगृहासाठी एकूण रुपये ५.०० कोटी निधीची तरतुद आहे. सदर नाट्यगृह उभारण्याबाबत मागणी केलेल्या जागेवर अमरावती शहराच्या मंजूर पहिल्या सुधारीत विकास योजनेमध्ये, "आरक्षण क्र.४२४-वाचनालय", "आरक्षण क्र.४२५-प्रसुतीगृह व "आरक्षण क्र.४२६-प्राथमिक शाळा" ही आरक्षणे प्रस्तावित असल्यामुळे सदर जागेमध्ये नाट्यगृहाचा वापर अनुज्ञेय होत नाही. तथापी, शासनास मंजुरीस्तव सादर करण्यात आलेल्या प्रारुप दुसऱ्या सुधारीत विकास योजनेमध्ये सदर जागेवर "आरक्षण क्र.१३५-सार्वजनिक सुविधा" (Public Amenity) हे आरक्षण प्रस्तावित आहे. उक्त प्रारुप विकास योजना (दु.सु.) मंजुरी नंतर, सदर जागेवर सार्वजनिक सुविधा (Public Amenity) अंतर्गत नाट्यगृह प्रस्तावित करता येईल, व त्या अनुषंगाने अमरावती मूहानगरपालिकेने नाट्यगृह बांधकामाचा विस्तृत आराखडा (D.P.R.) तयार करण्याची तजवीज ठेवलेली आहे. तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.०४.२७.३ नुसार शासनाच्या मान्यतेने, विषयांकित जागेवरील मंजूर विकास योजनेतील Buildable आरक्षणांखालील जागेवर नाट्यगृहाचा वापर अनुज्ञेय होऊ शकेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील चिकलठाणा येथील कचरा प्रक्रिया केंद्रातील विषारी पाण्याच्या गळतीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(७) * २१५३१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील चिकलठाणा येथे महानगरपालिकेकडून उभारण्यात आलेल्या कचरा प्रक्रिया केंद्रातील विषारी पाण्याच्या गळतीमुळे आजुबाजुच्या विहिरींचे व शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचरा प्रक्रिया केंद्रात विषारी पाण्यासाठी बांधण्यात आलेल्या स्वतंत्र टँकमधील पाणी टँकरद्वारे शहराबाहेर ड्रेनेजमध्ये सोडण्याची प्रक्रिया बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे दरवर्षी पावसाळ्यामध्ये दूषित पाणी जमा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या टँकमधून पाणी शेतात येत असल्यामुळे पडेगाव येथे प्रकल्पाच्या ठिकाणी करण्यात आलेल्या उपाययोजना चिकलठाणा येथील प्रकल्पामध्ये करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना करुनसुध्दा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने चिकलठाणा येथील शेतकऱ्यांना शेतीची नुकसान भरपाई देण्याबाबत, तसेच कचरा प्रक्रिया केंद्रातुन निघणाऱ्या सांडपाण्याबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

चिकलठाणा घनकचरा प्रक्रिया केंद्र परिसरात केंद्राच्या परिसरात जमा झालेले पाणी व लिगेसी वेस्ट वरील पाणी केंद्राच्या परिसराजवळ असलेल्या ओढ्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०२३ दरम्यान पडलेल्या पावसामुळे वाहून गेले.

या दूषित पाण्यामुळे केंद्राच्या जवळ असलेल्या ५ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक २६/१०/२०२३ च्या पत्रान्वये या प्रकरणाची माहीती मागितली असून महानगरपालिकेच्या दिनांक ०३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक माहितीसह खुलासा सादर करण्यात आला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे दिनांक १९/१०/२०२३ रोजीचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. याबाबत नुकसान भरपाईसाठी महानगरपालिकेकडून पंचनामा करण्यात येवून चिकलठाणा प्रकल्पाजवळील शेतात दूषित पाणी गेल्यामुळे नुकसान झालेले शेतकरी यांना प्रत्येकी रुपये २५,०००/- असे एकूण रुपये १,२५,०००/- नुकसान भरपाई प्लांट ऑपरेटर मे.मायो वेसल्स यांच्याद्वारे देणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) भविष्यात सदरील बाब घडू नये याकरीता प्रक्रिया केंद्र ते झाल्टा येथील मलनि:स्सारण केंद्रापर्यंत भूमीगत पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येत आहे.
(५) लागू नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारांमधील स्वच्छतागृहांचे व्यवस्थापन करण्याबाबत**

**(८) * २१७७४ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील स्थानक/आगारातील शौचालयाचे व्यवस्थापन करण्याकरीता महामंडळाने सुलभ इंटरनॅशनल या स्वयंसेवी संस्थेशी करार केला असून, करारातील अटी व शर्तींचे या संस्थेकडून वारंवार उल्लंघन होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ५८० आगारांपैकी १३५ हून अधिक आगारांमध्ये या संस्थेकडून योग्य दर्जाची सेवा पुरविली जात नसून, एसटी स्थानक-आगारातील शौचालयांत दुर्गंधी, पाण्याची कमतरता, गळके नळ, तुटलेले दरवाजे इ. बाबींमुळे प्रवाशांची होणारी गैरसोय पहाता प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुलभ इंटरनॅशनल या स्वयंसेवी संस्थेतील दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सुलभ इंटरनॅशनल या स्वयंसेवी संस्थेने शासनाशी केलेल्या कराराची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारांचे सुशोभिकरण व्हावे, प्रवाशांना सुलभ, स्वच्छ शौचालये उपलब्ध व्हावीत यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) सुलभ इंटरनॅशनल संस्थेद्वारे व्यवस्थापन करण्यात येणाऱ्या प्रसाधनगृहाच्या अस्वच्छते बाबत काही ठिकाणी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३), (४) व (५) सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑर्गनॅायझेशन या संस्थेला प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करारातील अटी व शर्तीनुसार प्रसाधनगृहांची स्वच्छता राखण्याबाबत दिनांक २९/०५/२३ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत. तसेच दिनांक ०४/०७/२०२३ रोजी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या समवेतील बैठकीत सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑर्गनायझेशन यांना प्रसाधनगृह स्वच्छतेबाबत आदेश देण्यात आले आहेत.

रा.प.महामंडळातील बसस्थानकावरील प्रसाधनगृह आणि एस.टी. आगार स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी दिनांक ०१/०५/२०२३ पासून सुरु असलेल्या हिंदुहृदय बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर अभियान' अंतर्गत परिपत्रक दिनांक ०४/०७/२०२३ अन्वये सर्व विभाग नियंत्रकाना स्वच्छतेच्या व सर्वेक्षणाच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान मंजूर करणेबाबत

**(९) * २१३१२ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९३३७ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील १०४ खाजगी विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करणेबाबत आणि मुंबईतील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना एमईपीएस अथवा ग्रँट इन कोड लागू करणेबाबतची मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हिस्सा न मिळाल्यामुळे हे अनुदान नाकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत खाजगी विनाअनुदानित १०४ शाळांना १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करणेबाबत आणि मुंबईतील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना एमईपीएस अथवा ग्रँट इन कोड लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील ९२ विनाअनुदानित शाळांना पहिल्या वर्षी २०%, दुसऱ्या वर्षी ४०%, तिसऱ्या वर्षी ६०%, चौथ्या वर्षी ८०% व पाचव्या वर्षापासून १००% अनुदान प्रदान करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १७/११/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

एकूण अनुदानापैकी ५०% हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा तर ५०% हिस्सा राज्य शासनाचा असणार आहे. राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम प्रतिपूर्तीद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांना एमईपीएस लागू करण्याची बाब धोरणात्मक आहे. तथापि, शाळा अनुदान सहाय्य संहिता, १९६८ व त्यामधील तरतुदी खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांना लागू आहेत व सद्य:स्थितीत त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण किनारपट्टीवरील विविध पायाभूत प्रकल्पामुळे नष्ट होणाऱ्या कांदळवनाचे संवर्धन करण्याबाबत

**(१०) * २१६५७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण किनारपट्टीवरील विविध पायाभूत प्रकल्पांच्या नावाखाली नष्ट होत असलेल्या कांदळवनाची काटेकोर पध्दतीने तपासणी करावी आणि देखरेखीसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर योग्य ती जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी नॅटकनेक्ट फाऊंडेशनने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त प्रकरणाची चौकशी करावी आणि त्याचा अहवाल देण्याबाबतचे निर्देश केंद्र शासनाने राज्याच्या वन विभागाला दिलेले असल्याची माहिती दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कांदळवन व पाणथळ क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन प्रभावीपणे होण्यासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाने राज्याच्या वन विभागाला दिलेल्या निदेशानुसार सदर समितीमार्फत अहवाल सादर करण्याकरीता स्थळपाहणी करण्याचे निर्देश देऊन संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करण्याच्या दृष्टीने तसेच कांदळवनांची काटेकोर पध्दतीने तपासणी करणे आणि देखरेखीसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर योग्य ती जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पी.जी.पोर्टल या केंद्रीकृत सार्वजनिक तक्रारीचे निवारण व देखरेख प्रणालीव्दारे श्री.बी.एन.कुमार Net-connect Foundation यांच्याकडून दिनांक २५/०८/२०२३ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे. तथापि, सदर तक्रारीमध्ये उरण किनारपट्टीबाबत उल्लेख नसून सर्वसाधारण कांदळवन क्षेत्रात होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पासंदर्भात कांदळवनाची होणारी तोड व त्यावर असणाऱ्या सनियंत्रण या संदर्भात आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) केंद्र शासनाच्या निदेशानुसार अधिसूचित कांदळवन क्षेत्रात विविध पायाभूत सुविधांकरीता होत असलेल्या वळतीकरण प्रस्तावांसंदर्भात क्षेत्रिय स्तरावर वन विभागाकडून सखोल चौकशी करण्यात आलेली आहे.

कांदळवन क्षेत्रातील पायाभूत सुविधांकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर करणे आवश्यक असते. सदर प्रस्तावांतर्गत तोड होणाऱ्या वृक्षांची गणना क्षेत्रिय स्तरावरुन करण्यात येत असते. सदर प्रस्तावास केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पात तोड होणाऱ्या कांदळवन वृक्षाबाबत मा.उच्च न्यायालयाकडून परवानगी घेणे बंधनकारक असते. मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशात नमूद कांदळवन वृक्षांची तोड क्षेत्रिय स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या निगराणीखाली होत असते. सदर प्रक्रियेत तोड होणाऱ्या कांदळवन वृक्षाबाबत दक्षता घेण्यात येत असल्याने, श्री.बी.एन. कुमार Net connect Foundation यांच्या तक्रारीत उपस्थित केलेल्या कांदळवन वृक्ष तोडीबाबत सनियंत्रण (Check) होत नसल्याची बाब वास्तविक नाही.

-----------------

## राज्यात विविध पद भरतीसाठी शासन व खाजगी कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत

**(११) * २१३३९ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १९६३६ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ७५ हजार पदांच्या महाभरतीची घोषणा केली असून शासन निर्णयाप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या ९ कंपन्यांच्यामार्फत कंत्राटी पध्दतीने पद भरती करण्यात येणार आहे, त्यानुसार वन विभाग, महसूल विभाग (तलाठी), जिल्हा परिषद व आरोग्य विभागाची भरती करण्यात येणार असून, राज्यात सुरू असलेल्या भरती प्रक्रियेत खुल्या वर्गासाठी एक हजार व मागासवर्गीय उमेदवारांना ९०० रुपयांचे शुल्क भरावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांकरीता खाजगी यंत्रणांकडून अर्ज करण्यासाठी सहाशे ते हजार रुपये शुल्क आकारले जात असून वेगवेगळया पदांसाठी हे शुल्क स्वंतत्र आकारल्याने एका विद्यार्थ्यांला परीक्षा शुल्क म्हणून किमान ५ हजार ते ६ हजार रुपये इतके शुल्क भरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात टीसीएस आणि आयबीपीएस या दोन खाजगी कंपन्यांच्या माध्यमातून सरळसेवा भरती घेण्यात आली व या भरती प्रक्रियेतून आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचे प्रवेश शुल्क उमेदवारांकडून जमा करण्यात आले असून शासनाच्या महसूल, सार्वजनिक आरोग्य आणि ग्रामविकास या तीनही विभागांच्या रिक्त पदांच्या भरतीसाठी २७ लाख ५ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून सदर भरती प्रक्रियेतून सुमारे २६५ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेरोजगार युवकांकडून परीक्षांसाठी जादा शुल्क आकारण्यात येत असून राज्यात असणाऱ्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बेरोजगार उमेदवारांकडून घेतलेले सदर जादा शुल्क परत देण्याचे, तसेच निवडीपश्चात पात्र उमेदवारांकडून परीक्षेचा खर्च वसूल करण्याची प्रक्रिया राबवण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधींसह विविध संघटनांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासकीय कार्यालये व शासनाच्या अधिपत्याखालील अन्य कार्यालयांतील उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने तसेच वाजवी परीक्षा शुल्क आकारण्याबाबत संबंधित विभागांना आदेश देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५००० पदभरती करण्याची घोषणा राज्य शासनाने केली आहे. सदर पदभरती प्रक्रिया कंत्राटी तत्त्वावर नसून, सरळसेवेने करण्यात येणार आहे.

गट ब (अराजपत्रीत) गट क आणि गट ड पदांसाठी परीक्षाकरीता TCS व IBPS या कंपन्यांचे दर वेगवेगळे असल्याने या दरांमध्ये सुसूत्रता यावी यासाठी कंपन्यांना द्यावयाची रक्कम, कर व प्रशासकीय खर्च मिळून प्रति उमेदवार परीक्षा शुल्क रुपये १०००/- व यामध्ये राखीव प्रवर्गासाठी १०% सवलत देण्याबाबतचा निर्णय दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

आयोगाकडून स्पर्धा परीक्षांसाठी अराखीव उमेदवारांसाठी रुपये ५००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये २५०/- शुल्क आकारण्यात येते. तसेच सरळसेवा भरतीसाठी ज्या संवर्गासाठी अनुभव आवश्यक आहे, त्या संवर्गाकरीता अराखीव उमेदवारांसाठी रुपये ६७५/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये ४०५/- शुल्क आकारण्यात येते.
(३) उमेदवारांकडून जमा झालेली परीक्षा शुल्काची सर्व रक्कम ही शासन तिजोरीत महसूली जमा होत नसून, सदर रकमेतून स्पर्धा परीक्षेचा खर्च भागविला जातो. तसेच आवश्यकतेप्रमाणे काही अतिरिक्त प्रशासकीय खर्च लागल्यास, अर्थसंकल्पात तरतूद करुन सदर खर्च भागविला जातो. यामधून काही रक्कम उरल्यास ती शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात येते.
(४), (५) व (६) स्पर्धा परीक्षेचे शुल्क कमी करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून निवेदन शासनास प्राप्त झाली आहेत.

सदर कंपन्यांचे प्रति उमेदवार परीक्षा दर वेगवेगळे असल्याने तसेच वेगवेगळया पदभरतीसाठी प्रति उमेदवार परीक्षा शुल्कही वेगवेगळे आकारले जाऊ शकत असल्याने, दरात सुसूत्रता यावी यासाठी कंपनीच्या प्रति उमेदवार दरात कर (जी.एस.टी.) व प्रशासकीय खर्च या बाबी समाविष्ट करुन उमेदवारांकडून एकच परीक्षा शुल्क आकारण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## मुंबईतील उमरखाडी, डोंगरी, दादर, माटुंगा, धारावी, खार, वांद्रे, सांताक्रुझ, बोरिवली या ठिकाणी सर्वाधिक दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१२) * २१११२६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील उमरखाडी, डोंगरी, दादर, माटुंगा, धारावी, खार, वांद्रे, सांताक्रुझ, बोरिवली या ठिकाणी सर्वाधिक दूषित पाणीपुरवठा होत असून, दूषित पाणी पुरवठ्याचे प्रमाण उमरखाडीत ६.७ टक्के, बोरिवलीत २.१ टक्के, दादर, माटुंगा, धारावीत १.७ टक्के, खार, वांद्रे, सांताक्रूझ मध्ये १.६ टक्के असल्याची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वार्षिक पर्यावरण अहवालातून दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणीपुरवठ्याच्या जुन्या आणि खराब पाईपलाईनमुळे पाण्याच्या दूषिततेत वाढ होऊन या दूषित पाण्यामुळे अतिसारासारखे आजार बळावले असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) वार्षिक पर्यावरण स्थिती अहवालाच्या (ईएसआर) आकडेवारीनुसार दादर, धारावी, परळ, भायखळा, गोरेगाव आणि मुलुंड यांसारख्या भागात गत वर्षभरात पिण्याच्या पाण्याच्या दुषिततेत वाढ नोंदविली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईला पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता रहावी यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ वॉर्डातून दररोज २०० पाण्याचे नमुने घेण्यात येत असून महानगरपालिकेच्या आरोग्य व जल विभागाकडून पाण्याचे नमुने गोळा केले जातात तसेच गोळा करण्यात येणारे पाण्याचे नमुने तपासणीसाठी महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत पाठविण्यात येत असून पाण्याच्या नमुन्यांची तपासणी योग्य प्रकारे करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईकरांना अविरतपणे शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील उमरखाडी, डोंगरी, दादर, माटुंगा, धारावी, खार, वांद्रे, सांताक्रुझ, बोरिवली येथील दूषित पाणीपुरवठाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस यापूर्वी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. परंतु सद्य:स्थितीत या विभागांमध्ये पिण्यायोग्य पाणीपुरवठा होत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कुठेही दूषित पाण्याची तक्रार आल्यास सदर परिसर विभागीय स्तरावर देखरेखीखाली ठेवण्यात येतो व पाणी पुरवठ्याच्या वेळी त्या परिसरामध्ये परिसर नियंत्रित करुन दूषित पाणी सर्वप्रथम फायर हायड्रंड किंवा फ्लशिंग पॉईटंद्वारे संपूर्णपणे बाहेर काढण्यात येते व जागेवर पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करुन समाधानकारक पिण्यायोग्य पाणी आहे याची खात्री करुन नंतरच जलजोडणी ग्राहकांना पिण्यायोग्य पाणीपुरवठा करण्यात येतो.

दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ च्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वार्षिक पर्यावरण अहवालातील दूषित पाण्याच्या सर्व ठिकाणी आवश्यक कामे करुन तेथील पाणी पिण्यायोग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

(२) मुंबईतील भायखळा, दादर व गोरेगांव येथे ऑक्टोबर, २०२२ च्या तुलनेत ऑक्टोबर, २०२३ मध्ये गॅस्ट्रो रुग्णांच्या संख्येत किंचित वाढ झालेली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २५ वॉर्ड व २६ सेवा जलाशयातून दररोज ठरवून दिलेल्या (Fixed point) २०० ठिकाणांच्या पिण्याच्या पाण्याचे नमुने जी/उत्तर प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येतात. तसेच भांडुप संकुल, तुळशी, विहार, पिसे पांजरापूर येथील फिल्ट्रेशन प्लांटमधील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणी केल्यानंतर पिण्यास योग्य असल्यास पाणीपुरवठा करण्यात येतो.

बृहन्मुंबई महानगरपालिका प्रयोगशाळेला आंतरराष्ट्रीय दर्जाचे ISO १७०२५:२०१७ National Accreditation Board for Testing and Calibration (NABL) चे मानांकन मिळालेले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या IS १०५००:२०१२ मानकानुसार आधुनिक पध्दतीचा वापर करुन पाणी नमुन्यातील कोलीफॉम जीवाणू व ई-कोलाय जीवाणू यांची तपासणी केली जाते. पाणी नमुन्यांचे विश्लेषण करण्यासाठी IS १५१८५:२०१६ या पध्दतीनुसार Membrance Filtration Technology (MFT) या यद्ययावत यंत्राचा वापर केला जातो.

पाणी नमुने गोळा करण्याच्या तंत्राची बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी व त्यांच्या कर्मचारी वर्गाला तसेच पाणी नमुने गोळा करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांना माहिती देण्यासाठी महानगरपालिका प्रयोगशाळा प्रशिक्षण देते.

(४) तुळशी, विहार, तानसा, वैतरणा (मोडकसागर), मध्य वैतरणा हे बृहन्मुंबई महानगरपालिका व उर्ध्व वैतरणा, भातसा हे राज्य शासनाच्या अखत्यारीतील असे एकूण ७ तलाव बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा करण्याकरीता मुख्य पाण्याचे स्त्रोत म्हणून वापरले जातात. या मुख्य स्त्रोतांतून घेण्यात आलेले पाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडुप संकुल, पांजरापूर संकुल तसेच तुळशी व विहार येथील जलशुध्दीकरण केंद्रात शुध्द केले जाते व नंतर हरिनीकरण (क्लोरीनेशन) या मान्यताप्राप्त क्रियांद्वारे बीआयएस-१०५००:१९९१ या भारतीय मानकातील निकषाप्रमाणे जलशुध्दीकरण केले जाते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध जलाशयांमध्ये हरीनीकरण (क्लोरीनेशन) करण्याची सोय असून पाण्याच्या शुध्दतेबाबत योग्य नियंत्रण ठेवले जाते.

पाणी पुरवठ्याच्या वितरण व्यवस्थेत अविरतपणे शुध्द पाण्याचा पुरवठा होण्याकरीता विभागीय स्तरावर खालीलप्रमाणे विविध उपाययोजना करण्यात येतात :-

- जीर्ण व जुन्या जलवाहिन्या बदलणे.
- जमिनीखालील गळती शोधण्याकरीता वेळोवेळी पाहणी करण्यात येते व गळती आढळल्यास त्वरीत कार्यवाही करण्यात येते.
- पाण्याच्या नमुना तपासणीत एखादा नमुना अयोग्य आढळल्यास त्वरीत जागेची पाहणी करुन दूषित पाण्याचे कारण शोधून योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
- विभाग स्तरावर दूषित पाण्याची तक्रार प्राप्त झाल्यास त्वरीत सदर ठिकाणी पाहणी करुन तसेच अत्याधुनिक कॅमेरामार्फत जलवाहिन्यांची अंतर्गत पाहणी करुन दूषित पाण्याच्या स्त्रोताचा शोध घेण्यात येतो व जलवाहिनी दुरुस्त करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कचरा आणि डेब्रिजच्या समस्यांचे निराकरण करण्याकरीता विविध उपक्रम राबविण्याबाबत

**(१३) * २१४७१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कायमस्वरूपी आणि कंत्राटी सफाई कामगार अहोरात्र कार्यरत असतानाही पश्चिम उपनगरातील अनेक विभागात कचरा आणि डेब्रिजच्या समस्यांचे निराकरण झाले नसून उपनगरांतील अंधेरी (पश्चिम), कुर्ला, भांडुप, मालाड, गोरेगाव, आदी भागातून कचरा व डेब्रिज समस्यांच्या ६ हजार ३८८ तक्रारी प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुंबई कचरामुक्तीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्याचे निदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेला देऊन त्याची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रहिवाश्यांच्या सोयीसाठी घन कचरा व्यवस्थापन विभागातर्फे कचऱ्याच्या तक्रारीसाठी मुख्यमंत्री सहायता क्रमांक - ८१६९६८१६९७ तयार करण्यात आला आहे. विभागातील रहिवाश्यांकडून सदर वॉट्सप नंबरवर कचऱ्यासंदर्भात तक्रारी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच कचऱ्याचे फोटो व स्थान देखील तक्रारीसोबत कळविता येते. तसेच सदर तक्रारीच्या ठिकाणानुसार तक्रार थेट संबंधित विभाग कार्यालयास वर्ग होते. सदर प्राप्त तक्रारींचे विभागीय सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) यांनी कमीत कमी वेळेत निराकरण करून नागरिकांना त्यांच्या तक्रारींचे निराकरण झाले असे कळविण्यात येते. माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये उपनगरातील अंधेरी (पश्चिम), कुर्ला, भांडुप, मालाड, गोरेगाव आदी भागातून कचरा व डेब्रिज समस्यांच्या ६ हजार ३८८ तक्रारी प्राप्त झाल्या असून सर्व तक्रारींचे निराकरण विहीत वेळेत झालेले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका परिसरात दररोज अंदाजे ६४०० टन प्रति दिन कचऱ्याची वाहतूक व विल्हेवाट केली जाते. मुंबई व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात.

यात घरोघरी/ उगमस्थळी कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करणे व त्याबाबत लोकांचे प्रबोधन करणे, ओल्या व सुक्या कचऱ्याचे वेगवेगळे संकलन करण्याकरीता विशिष्ट गाड्यांची सेवा उपलब्ध करणे, विभाग स्तरावर विकेंद्रीय पध्दतीने ओल्या कचऱ्याची प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे, कचरा कमी करणे-पुन:वापर करणे-प्रक्रिया करणे (Reduce-Reuse-Recycle) तत्वाचा लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याकरीता विभागस्तरावर कार्यक्रम आयोजित करणे, झोपडपट्टीमध्ये स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानांतर्गत कचऱ्याचे उगमस्थळी वर्गीकरण करुन शक्य असल्यास कचऱ्याचे खतामध्ये रुपांतरण करणे, ओला कचरा पक्रियाकरीता संस्थांना प्रमाणित करुन गृहसंकुलातून संकलित केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे असे विविध उपक्रम बृहन्मुंबई महापालिकेमार्फत राबविले जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुंबईसह इतर महानगरांतील तसेच उरण (जि.रायगड) तालुक्यातील जल प्रदूषणत वाढ होत असल्याबाबत

**(१४) * २११९० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह महानगरांमध्ये हरित क्षेत्र कमी झाल्यामुळे वायु प्रदूषण, समुद्र प्रदूषण इत्यादी प्रदुषणांचा आलेख वाढत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण (जि.रायगड) तालुक्यात विविध राष्ट्रीय प्रकल्प, कंपन्या कार्यरत असून, या कंपन्यांमधून मोठ्या प्रमाणात जल तसेच वायु प्रदूषण होत असून, भोपाळ गॅस दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती सदर परिसरातील नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरण तालुक्यातील नागाव समुद्रकिनारी ओएनजीसी प्रकल्पामुळे नागाव तसेच मातवली या दोन ग्रामपंचायतीत वायु तसेच जलप्रदुषणाने उच्चांक गाठला असून कंपनीतून सोडण्यात येणाऱ्या सल्फरयुक्त एसओटू (SO2) व एचटूएस (H2S) हे रसायनयुक्त पाणी गावात पसरल्यामुळे त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर तसेच पशुधनावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रदुषणामुळे विहिरी व कुपनलिकेच्या पाण्यालाही गॅसचा विशिष्ट वास येत असून तेच पाणी नागरिकांना प्यावे लागत असून, ओएनजीसी प्रकल्पाने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करत प्रकल्पाचे काम सुरु ठेवून विनापरवाना हजारो झाडांची कत्तल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईसह महानगरांतील प्रदूषण रोखुन हवेची गुणवत्ता सुधारण्याच्यादृष्टीने तसेच उरण (जि.रायगड) तालुक्यातील नियमांचे उल्लघन करणारे विविध राष्ट्रीय प्रकल्प व कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील हवेची गुणवत्ता ऑगस्ट महिन्यात खालावत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उरण परिसरातील समुद्राच्या पाण्याचे नमुने संकलित केले असता त्यामध्ये पाण्याची गुणवत्ता खालावल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उरण तालुक्यातील ऑईल अ‍ॅण्ड नॅच्युरल गॅस लि. यांच्या व्यतिरिक्त प्रदूषण विषयक तक्रार प्राप्त नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत नागाव, उरण यांनी पिण्याच्या पाण्याला वास येत असल्याबाबतची तक्रार ऑइल अ‍ॅण्ड नॅच्युरल गॅस लि. या कंपनीकडे व पंचायत समिती उरण यांच्याकडे केली आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांचे दिनांक ०१/१२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार ग्रामपंचायत नागाव व म्हातवली परिसरातील नागरिकांना एमआयडीसीच्या मुख्य जलवाहीनी वरून टॅपींग कनेक्शनव्दारे पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वित असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाही. मात्र परिसरात असणाऱ्या विहिरी व कुपनलिकेतील पाणी पिण्यासाठी वापरत नाही, तसेच नागाव व म्हातवली परिसरातील पशुपालन करणाऱ्या पशुपालकांच्या प्रत्यक्ष घरी जावून गुरांच्या गोठ्यात भेटी देऊन पशुधनावर कोणताही परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नसल्याबाबत कळविले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत हवा प्रदूषण संदर्भात वेळोवेळी तपासणी केली जाते यामध्ये एचटूएस व सल्फरडाय ऑक्साईड यांचे प्रमाण विहित मर्यादेत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तक्रारीच्या अनुषंगाने नजीकच्या विहिरींचे पाणी पृथ:करणासाठी घेण्यात आले होते. पृथ:करण अहवालावरून पाण्यामध्ये सल्फरयुक्त घटकांचे प्रमाण विहित मर्यादेत आढळून आले.
(४) मे. ऑइल अ‍ॅण्ड नॅच्युरल गॅस कॉरपोरेशन लि., उरण या कंपनीमार्फत नजीकच्या नागाव या गावाला ८५.०० लाख लिटर/महिना पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा केला जातो. तसेच कॉरपोरेट सामाजिक जवाबदारी (CSR) अंतर्गत चार गावांना पिण्याचे पाणी शुध्दिकरण यंत्रणा (RO Plant) देण्यात आले आहेत. वृक्षतोडीबाबत परिक्षेत्र वन अधिकारी उरण यांच्या दिनांक २९/११/२०२३ च्या अनुषंगाने

ओएनजीसी उरण यांना वृक्षतोडीसाठी पत्र क्र. अ.९७७/२०१८-१९, दि ०६/१०/२०१८ रोजी सदर क्षेत्रातील ४६२ बंधनमुक्त प्रजातीची झाडे तोडण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. ऑइल ॲण्ड नॅच्युरल गॅस कॉरपोरेशन लि., उरण कंपनीला हवा व जल प्रदूषण संदर्भात कारणे दाखवा नोटीस दिनांक ११/०९/२०२३ रोजी बजावण्यात आली तसेच उद्योगाची १२.५ लक्ष रुपयाची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. तसेच उरण परिसरातील जल व हवा प्रदूषण कायदयाचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांना मंडळाकडून ०३ कारणे दाखवा नोटीस, ०४ प्रस्तावित आदेश, ०१ अंतरीम निर्देश देण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढते वायू प्रदूषण रोखण्याबाबत

**(१५) * २२१५४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वायु प्रदुषणाची समस्या गंभीर असून हवेतील प्रदूषण (पार्टीक्युलेट मॅटर) १० ची सरासरी जास्त असलेल्या शहरांत महाराष्ट्र राज्यातील शहरांची संख्या १९ असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार मुंबईतील हवेचा दर्जा अति धोकादायक पातळीपर्यंत खालावला असून मुंबईतील हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वाढते वायू प्रदूषण रोखण्यासाठी राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम राबविला जात असून देशभरात हवेचा दर घसरल्याने शुध्द हवेसाठी गत पाच वर्षात केंद्र शासनाकडून राज्याला १ हजार ६८४ कोटी रुपये मंजूर झाले असून सन २०२४ पर्यंत हवेतील प्रदूषण (पार्टीक्युलेट मॅटर) १०चे प्रमाण २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील १९ शहरांमध्ये पीएम १० चे सर्वाधिक असलेले प्रमाण सन २०२४ पर्यंत २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकनुसार काही ठराविक ठिकाणी धोकादायक पातळीपर्यंत खालावला होता.तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे सर्व संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत. या बाबतचा अहवाल मा.न्यायालयाने नियुक्ती केलेल्या समितीमार्फत सादर केला जातो.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १९ शहरांचा कृती आराखडा तयार करुन, राज्यस्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण समितीच्या संमतीने सदर कृती आराखडा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या त्रीसदस्यीय समितीस सादर केला होता व त्यास मान्यता मिळाली असून त्या अनुषंगाने कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचे आदेश महानगरपालिकेस देण्यात आले आहेत.

तसेच कृती आराखड्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी महानगरपालिका यांच्यासोबत आढावा बैठक घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील शासकीय सैनिकी शाळेतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत

**(१६) * २१३१८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील शासकीय सैनिकी शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने सन २०१९ मध्ये घेतला होता, परंतु उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतचे परिपत्रक काढले नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आली नसून ५२ प्रवेशित विद्यार्थ्यांना वर्गात बसू न देण्याचा निर्णय शाळा प्रशासनाने घेतला असल्याची बाब दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने परिपत्रक काढून शिष्यवृत्ती (निर्वाह भत्ता) मिळेपर्यंत शाळेने मुलांना फी भरण्यासाठी सक्ती करु नये आणि मुलांचे शैक्षणिक नुकसान करु नये असे निर्देश दिले असूनही शाळेने शासनाचे निर्देश डावलले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या निदेशांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित शाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली व शासन निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) चंद्रपूर येथील शासकीय सैनिकी शाळा ही केंद्रीय शाळा असून या सैनिकी शाळेतील प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त समाज कल्याण पुणे, यांनी शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातंर्गत शासकीय सैनिकी स्कूल, सातारा, श्री.शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रचलीत दराने करण्यात येणाऱ्या संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या धर्तीवर सैनिकी शाळा चंद्रपूर मध्ये प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही लाभ देण्याची बाब प्रस्तावित करण्यात आलेली असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

दरम्यान सहायक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर यांच्या दिनांक २०/०६/२०२३ व दिनांक १२/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राचार्य, सैनिकी शाळा, चंद्रपूर यांना शिष्यवृत्ती अभावी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना अडचणी येवू नयेत याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर शासन पत्र दिनांक ०४/१२/२०२३ अन्वये संस्थेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्यासाठी त्यांच्या शैक्षणिक बाबीमध्ये कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित संस्थेला देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथे बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्यासाठी निधीचे वितरण करण्याबाबत

**(१७) * २१२५० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १८८४४ ला दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने सन २०१६ मध्ये एमजीएम विद्यापीठाशेजारील प्रियदर्शनी उद्यानात मा.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला असून शासनाने रुपये ३५ कोटींच्या मंजूर निधीपैकी प्रत्यक्षात रुपये २३ कोटी वितरीत केले असून, कंत्राटदारास माहे मार्च, २०२१ मध्ये कार्यारंभ आदेश देवून १८ महिन्यांचा अवधी होऊनही स्मृती उद्यान व स्मारक विकसित करण्याची कामे अद्यापपर्यंत निधीअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पालकमंत्री, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी स्मारक व स्मृतीवनाच्या कामाचा आढावा घेतला असून, पुतळयाची संरचना अद्याप पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथील बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक पूर्ण करण्यासाठी पुतळयाच्या संरचनेस मान्यता घेऊन स्मृती उद्यान व स्मारक विकसित करण्याची प्रलंबित कामे पूर्णत्वास नेण्यासाठी उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सदर काम निधीअभावी प्रलंबित नाही.

छत्रपती संभाजीनगर येथे हिंदुह्दयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्यात येत आहे. स्मारकामध्ये त्यांचा पुतळा ब्राँझ धातुमध्ये उभारण्यात येत असून त्यासाठीची निविदा प्रक्रिया महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

स्मारकाच्या सर्व कामासाठी एकूण ३५.१९ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून आवश्यकतेनुसार त्यापैकी २३.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

मा.पालकमंत्री यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी या कामाचा आढावा घेतला आहे.

(३) आवश्यकतेनुसार निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मृत जनावरांच्या विल्हेवाटीकरीता इन्सिनरेटर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१८)** * **२१५४७ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मृत जनावरांच्या विल्हेवाटीकरीता गत ६ वर्षापूर्वी महानगरपालिकेच्या भांडेवाडी क्षेत्रात इन्सिनरेटर प्रकल्प मंजूर करुनही सदरहू प्रकल्पाच्या कामास अद्याप सुरुवात न केल्यामुळे प्रकल्पाचे बांधकाम प्रलंबित असून, नागपूर शहरातील पाळीव तथा भटक्या मृत जनावरांना जमिनीत पुरले जात असल्यामुळे भांडेवाडी व इतर भागामध्ये भूगर्भातील पाणी दूषित झाल्यामुळे विहीरी तथा बोअरवेल दूषित होवून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ६ वर्षांपासून इन्सिनरेटर प्रकल्प मंजूर होऊनही काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू प्रकल्पाचे काम सुरु करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मृत जनावरांची योग्य विल्हेवाट लावण्याबाबतच्या इन्सिनरेटर प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन सदरहू भागात आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (नागरी)-१.० अंतर्गत नागपूर महानगरपालिकेकरीता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास रुपये २८८.६८ कोटींस दिनांक १४/०५/२०२१ रोजी राज्य शासनाकडून मंजूरी देण्यात आली. त्यामध्ये Animal Crematorium या रुपये ९.०० कोटींच्या प्रकल्पाचा समावेश आहे.

प्राप्त मंजूरीन्वये Animal Crematorium च्या कामाकरीता ईपीसी तत्वावर बांधकाम व ५ वर्षांकरीता देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता दिनांक ०३/०२/२०२३ ला निविदा काढण्यात येवून सदर निविदेत निम्नत्तम निविदाकार मे.सिकॉंन पोलुटेक सिस्टम प्रा.लि., लखनऊ यांचेशी दिनांक १२/०७/२०२३ ला करारनामा करण्यात येवून कार्यादेश देण्यात आलेला आहे.

पशू दहनभूमीमध्ये (Animal Crematorium) शास्त्रोक्त पध्दतीने मृत जनावरांची योग्यरीतीने विल्हेवाट लावण्याकरीता ५०० कि.ग्रॅम प्रति तास क्षमतेचे गॅस बर्नर इन्सिनरेटर लावण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत कंत्राटदाराद्वारे या कामाचे ड्रॉईंग, डिझाईन, मशिनरी मॅन्युफॅक्चरींग व जागा समतल करण्याचे

कार्य प्रगतीपथावर आहे. कंत्राटदाराने सादर केलेल्या वर्क शेडयुल नुसार या प्रकल्पाचे काम माहे जुलै, २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत मृत जनावरांच्या विल्हेवाटीकरीता खोल दफन पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रिक्षा – टॅक्सीमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम (जीपीएस) समांतर यंत्रणा बसविण्याबाबत

**(१९) * २१११६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रिक्षा – टॅक्सीत महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम (जीपीएस) समांतर यंत्रणा एका खाजगी कंपनीमार्फत मोफत बसविण्याबाबतचा प्रस्ताव सुमारे वर्षभरापूर्वी शासनाकडे सादर केला असल्याची बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरातील महिला प्रवाशांना रात्री-अपरात्री सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना असुरक्षित वाटू नये, तसेच पोलीस आणि परिवहन विभागांचे रिक्षाचालकांवर नियंत्रण रहावे व गुन्ह्यांची उकल करण्यासाठीही सदर यंत्रणेचे सहाय्य होण्याच्या उद्देशाने वाहनांमध्ये जीपीएस समांतर यंत्रणा बसविण्याची योजना आखण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव परिवहन विभागाने गत वर्षी शासनास पाठविला असून, अद्यापही त्याला मंजुरी मिळाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप व सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, मुंबईतील रिक्षा- टॅक्सींमध्ये महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांच्या गुन्ह्यांची संख्या पाहता सदरहू यंत्रणा कार्यान्वित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) मुंबईतील रिक्षा-टॅक्सीमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खाजगी कंपनीने मोबाईल ॲप तयार केले असून त्यामध्ये एक पॅनिक बटन दिले आहे. या ॲपच्या माध्यमातून अडचणीच्या वेळेस पॅनिक बटनचा वापर केल्यास थेट पोलीसांशी संपर्क साधता येणार आहे. तसेच सदर मोबाईल डिव्हाईसचे लाईव्ह लोकेशन देखील कमांड सेंटर / नियंत्रण कक्षास उपलब्ध होणार आहे. या मोबाईल ॲप संदर्भात संबंधित खाजगी कंपनीच्या प्रतिनिधीसोबत दिनांक २२/०८/२०२३ व दिनांक १२/१०/२०२३ रोजी प्रधान सचिव (परिवहन) यांचे दालनात प्रात्यक्षिक ठेवण्यात आले असता तांत्रिक अडचणीमुळे प्रात्यक्षिक होऊ शकले नाही. परिवहन आयुक्त कार्यालयास सदर ॲप संदर्भात प्रायोगिक चाचण्या करून ॲपची परिणामकारकता व तांत्रिक बाबी तपासून सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक १२/१०/२०२३ व दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हास व वालधुनी नदीचे प्रदूषण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२०) * २१४४६ श्री.निलय नाईक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३५४ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत, बदलापुर, अंबरनाथ, उल्हासनगर व कल्याण येथील ग्रामीण भागातून वालधुनी आणि उल्हास या दोन नद्या मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्या असून याच नद्यांच्या पाण्याचा पुरवठा सुमारे ५० लाखाहून अधिक नागरिकांना केला जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वालधुनी (जि.ठाणे) या नदीच्या प्रदूषणात वाढ झाल्याने उल्हासनगरमधील जीन्स कारखान्यांवर बंदी घालण्यात आलेली असून, सदर कारखाने कल्याण पूर्वेतील चिंचपाडा गाव, तसेच द्वारली येथील श्री स्वामी समर्थ कॉम्प्लेक्स जवळ सुरु करण्यात आले असून कंपनीमधून निघणाऱ्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे वालधुनी नदी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्यामुळे शेतकऱ्यांचा शेत जमिनी या सांडपाण्यामुळे नापीक होत असून, या सांडपाण्यामुळे नागरिकांना विविध रोगांची लागण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दूषित पाणी स्त्रोतांचे योग्य प्रकारे शुध्दीकरण करण्याबाबत उपाययोजना करुन सदर पाणी नमूने पुनर्तपासणीअंती पिण्यास वापरता यावे यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे, असल्यास, मलशुध्दीकरण प्रकल्प व घरगुती सांडपाणी प्रकल्प उभारण्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पाच शहरांतून वाहणाऱ्या उल्हास व वालधुनी नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने जीन्स कारखान्यांवर बंदी घालण्याबाबत तसेच मुळा मुठा नदीच्या धर्तीवर सदर दोन नद्या प्रदूषणमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कल्याण पूर्वेतील चिंचपाडा गाव तसेच व्दारली येथील श्री स्वामी समर्थ कॉम्प्लेक्स जवळ असलेले जीन्स उद्योग बंद करणे बाबतचे निर्देश दिले असून सदर उद्योग सध्या बंद आहेत.

- जिल्हा कृषी अधीक्षक, ठाणे व जिल्हा कृषी अधीक्षक, रायगड यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार रसायनयुक्त सांडपाण्यामुळे शेत जमीन नापीक झाली असल्याबाबतच्या तक्रारी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
- कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जिल्हा परिषद, ठाणे तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार रासायनिक सांडपाण्यामुळे नागरिकांना विविध आजारांची लागण झाल्याबाबत कोणतेही रुग्ण आढळून आलेले नाहीत.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस उल्हास नदीवरील मोहने व मोहिली उदंचन केंद्र येथून आवश्यक ती प्रक्रिया करून पाणीपुरवठा करण्यात येतो. वालधुनी नदीतून कोणत्याही शहरास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात नाही.

- कल्याण डोबिंवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांनी त्यांच्या हद्दीतील निर्माण होणारे घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता अनुक्रमे ९, ४, २ आणि १ मलशुध्दीकरण प्रकल्प उभारलेले असून उर्वरित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अतिरिक्त मलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) उल्हास नदी प्रदूषणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालय येथे अपील नं.१०५८२/२०१७ दाखल असून सदर प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी आढावा बैठक घेण्यात येत असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

- उल्हास व वालधुनी या दोन्ही नदयांचे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी CPCB ने ठरवून दिलेल्या २५ निकषांचे आधारावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कृती आराखडा तयार केला असून त्याची अंमलबजावणी सर्व संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उल्हास व वालधुनी नदी किनारी असलेले जीन्स उद्योग बंद करण्याबाबतचे निर्देश दिलेले असून हे सर्व जीन्स उद्योग सध्या बंद आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाच्या “स्मार्ट सिटी” पुरस्कारात राज्याची पिछेहाट झाल्याबाबत

**(२१) * २१४०५ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने जाहीर केलेल्या “स्मार्ट सिटी” पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राची पिछेहाट झाली असून पिंपरी-चिंचवड, सोलापूर महानगरपालिका यांना मिळालेले दुय्यम पुरस्कार वगळता राज्यातील अन्य मोठ्या शहरांची निराशा झाली असून या स्पर्धेतील ८ शहरातील महानगरपालिकांनी स्वच्छता व सुशोभिकरणावर मोठ्या प्रमाणावर खर्च केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील बहुतांश शहरे पुढील वर्षी “स्मार्ट सिटी” योजनेत अग्रेसर राहण्याकरीता कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या स्मार्ट सिटी पुरस्कारांमध्ये पिंपरी चिंचवड व सोलापूर महानगरपालिका यांना पुरस्कार प्राप्त झाले आहेत. केंद्र शासनाकडून घेण्यात आलेल्या इतर स्पर्धांमध्ये सुध्दा उर्वरीत स्मार्ट सिटी यांनी सहभाग नोंदवला असून काही स्मार्ट सिटीजना पुरस्कार देखील प्राप्त झाले आहेत.

स्मार्ट सिटीच्या शहरातील संबंधित ८ महानगरपालिकांनी स्वच्छता व सुशोभीकरणावर मोठ्या प्रमाणावर खर्च केला नसून महापालिकेच्या मंजूर निधीमधून या बाबीवर नियमित खर्च करण्यात आला आहे.

(२) स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत रुपये ९३०० कोटीच्या एकूण २६९ प्रकल्पांपैकी एकूण २०२ प्रकल्प पूर्ण झाले असून उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील प्रकल्प लवकरच पूर्ण करुन स्मार्ट सिटी योजनेत राज्यातील शहरांची कामगिरी सर्वोत्तम करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे थकीत अनुदान अदा करण्याबाबत

**(२२) * २१२७४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नशाबंदी मंडळ ही शासनाच्या व्यसनमुक्ती धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत कार्यरत असलेली एकमेव अनुदानित संस्था असून राज्यातील भावीपिढी व्यसनाधीन होऊ नये यासाठी सदर संस्था काम करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने नशाबंदी मंडळाचे रुपये १ कोटी थकविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य व्यसनाधिनतेच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असून दरवर्षी नशाबंदी मंडळांच्या रुपये ३० लाखांच्या अनुदानाला शासन मंजुरी देते परंतु, गत ९ वर्षामध्ये मंडळास ३० लाख प्रमाणे २ कोटी ७० लाख रुपयांचे अनुदान मिळणे क्रमप्राप्त असतानाही आयुक्तालयाकडून केवळ रुपये १ कोटी ५७ लाख ४२ हजारांचे अनुदान दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याला नशा मुक्तीच्या दिशेने अग्रेसर होण्याकरीता सदरील थकीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) नशाबंदी मंडळाने शासन निर्णय क्रमांक डीडीपी-१०९२/२३६२/(४८)/सुधार-१, दिनांक ६ मे, १९९२ च्या शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून सदर अटी व शर्तीचे नशाबंदी मंडळाकडून पालन होत नसल्याचे तसेच त्यांच्या कार्याची फलनिष्पत्ती स्पष्ट दिसून येत नसल्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यानुषंगाने नियमानुसार तपासणी करुन शासनस्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: सोलापूर जिल्ह्यात दिव्यांगांसाठी बॅटरीवर चालणारी तीन चाकी सायकल दुरुस्तीसाठी केंद्रे उभारण्याबाबत

**(२३) * २२००९ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सोलापूर जिल्ह्यात दिव्यांगांना देण्यात आलेल्या बॅटरीवर चालणाऱ्या तीन चाकी सायकल सतत नादुरुस्त होत असून दुरुस्तीसाठी दिव्यांगाना मुंबई व नाशिक येथे जावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगांकरीता बहुमोल असलेल्या सायकलीच्या दुरुस्ती व देखभालीसाठी सोलापूरसह राज्यातील इतर जिल्ह्यात, तालुक्याच्या ठिकाणी दुरुस्ती केंद्र सुरू करून या सायकली विनाशुल्क दुरुस्ती करून देण्याची मागणी दिव्यांगजन करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांगाना आवश्यक असणाऱ्या सायकलीची दुरुस्ती त्यांना नजिकच्या ठिकाणीच करुन मिळावी यादृष्टीने प्रत्येक जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी दुरुस्ती व देखभाल केंद्रे (सर्विस सेंटर) उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर योजना ही भारतीय कृत्रिम अवयव निर्माण केंद्र (एलिम्को) विभागीय केंद्र मुंबई (केंद्र सरकार उपक्रम) यांचेतर्फे माहे ऑक्टोबर, २०२३ या महिन्यात सोलापूर जिल्हातील पंढरपूर तालुक्यात बॅटरीवरील तीन सायकलचे वाटप करण्यात आले होते. सदरचे साहित्य हे कानपूर (उत्तर प्रदेश) येथून पंढरपूरला ट्रकने पोचविण्यात आले होते. या प्रवासात तीन पैकी दोन सायकल नादुरूस्त झाल्या होत्या याबाबत सदरचे वृत्त दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्द झाले होते. एलिम्को मुंबई शाखेशी संपर्क केला असता त्यांनी कानपूरहून पंढरपूर येथे मेकॅनिक पाठवून बॅटरीवरील सायकलीची दुरूस्ती मोफत करून दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शाहू मिल, कोल्हापूर येथे राजर्षी शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत

**(२४) * २२१४८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील शाहू मिल येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन मा.पालकमंत्री यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकासाठी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडे असलेली शाहू मिलची जागा महानगरपालिकेला हस्तांतरित झाली असून सदर स्मारकाबाबतचा आराखडा तयार करण्यात येऊन त्यास अंतिम मंजूरी मिळाली असून महानगरपालिकेकडे निधी हस्तांतरित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून महामंडळाकडे असणारी जमीन महानगरपालिकेस हस्तांतर करण्याबाबत तसेच उक्त स्मारकाबाबतचा आराखडा व निधी हस्तांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कोल्हापूर शहरातील शाहू मिल येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्मारक उभारण्याचे काम तीन महिन्यात सुरु करण्यात येईल, अशी घोषणा तत्कालिन मा.पालकमंत्री, कोल्हापूर यांनी केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वस्त्रोद्योग महामंडळाची जमीन कोल्हापूर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून वस्त्रोद्योग महामंडळाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

डिझाईन कन्सल्टंट आर्किटेक्ट प्रा.लि. पुणे यांनी तयार केलेल्या स्मारकाच्या आराखड्यास समितीने मंजूरी दिली आहे.

शाहू मिलची जागा कोल्हापूर महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर स्मारकाचा आराखडा व त्यासाठी आवश्यक असलेला निधी याबाबत शासनस्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील अनधिकृत शाळांच्या संचालकांविरुध्द महानगरपालिका प्रशासनाने गुन्हे नोंदविण्याचे आदेश दिल्याबाबत

**(२५) * २१६८९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथील चार अनधिकृत शाळांना महानगरपालिका प्रशासनाने सुमारे १५ कोटी ५४ लाख १० हजार रुपयांचा दंड आकारुन, आयुक्तांनी संबंधित शाळांच्या संचालकांविरुध्द गुन्हे नोंदविण्याचे आदेश दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत अनधिकृतपणे सुरु असलेल्या शाळा व संस्थाचालकांवर आरटीई अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ०४ अनधिकृत शाळांच्या संचालकांविरूध्द शिक्षण हक्क कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करणेसाठी, नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत पोलीस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छोट्या संवर्गातील पदभरतीच्या आरक्षणात अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना प्राधान्य मिळण्याबाबत

**(२६) * २१६२७ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ मार्च, १९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रर्वागातील बिंदू हा क्र.०२ वर असताना तो कालांतराने बिंदू ०४ व ०६ स्थानी नेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदू ०२ वर असताना ०४ पदास ०१ पद अनुसूचित जमातीकरीता राखीव होते परंतु, सद्य:स्थितीत ०६/०८ पदामागे ०१ पद अनुसूचित जमातीला मिळत असल्यामुळे छोट्या आस्थापनेवर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना संधी प्राप्त होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय रद्द करण्यात येऊन पूर्वीप्रमाणे बिंदू नामावली लागू करण्यात यावी अशी मागणी जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी केली असता तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आश्वासनांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक २९/०३/१९९७ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवेसाठी १०० पदांची बिंदु नामावली विहित केली होती. त्यानुसार बिंदु क्र.२ हा अनुसूचित जमातीकरीता उपलब्ध करून देण्यात आला होता. सद्य:स्थितीत ६२% आरक्षणानुसार दिनांक ०६/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये १०० पदांची बिंदुनामावली सुधारीत करण्यात आली आहे. त्यानुसार बिंदु क्र.२ हा अनुसूचित जमातीकरीता उपलब्ध करून देण्यात आला आहे.

छोट्या संवर्गासाठी दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर ८ पदांमध्ये अनुसूचित जमातीला १ स्वतंत्र पद प्राप्त होत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार दिनांक २९/०३/१९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच सद्य:स्थिती विचारात घेऊन सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयाबाबत पुनर्विचार करण्याची शिफारस केली आहे. याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी निजामपुर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) * २१५५८ श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १८८८२ ला दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने भुयारी गटारासाठी बनविण्यात आलेले चेंबर तसेच मलनि:स्सारण होण्यासाठी टाकण्यात आलेले पाईप यांची सक्षमता न तपासता रुपये ४२७ कोटींची देयके अदा केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६ मलशुध्दीकरण केंद्रे एच.टी.पी. व ९ पंपिंग स्टेशनसाठी रुपये १५० कोटीची गरज असून काम झाल्यानंतर बिले अदा करावयाची असताना ९५% आगाऊ जादा बिले अदा करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ साठी रुपये ४२७ कोटींपैकी रुपये ३८७ कोटी एवढया रकमेची देयके ईगल कंट्रक्शन कंपनीला अदा केली असून त्याबाबत कुलसचिव, विधी व बीजीओ सचिवालय, भारतीय औद्योगीक संस्था, पवई (मुंबई) यांच्याकडून खातरजमा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी शहर भुयारी गटार योजनेसाठी मलनि:सारण पाईप टाकल्यानंतर ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झालेली असून लोकांचे अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भुयारी गटार योजनेच्या अनियमिततेच्या चौकशीसाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा.मुख्य सचिव, यांच्याकडे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मागविलेल्या अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर रुपये ४२७.९८ कोटी किंमतीच्या भुयारी गटार टप्पा-२ प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे आय.आय.टी., मुंबई यांचेमार्फत तांत्रिक मूल्यमापन करून प्रमाणित अहवालामध्ये नमूद चेंबर्स, मलनिःस्सारण पाईप व इतर उपांगे ही Central Public Health and Environmental Engineering Organisation (CPHEEO) १९९३ मानकानुसार घेण्यात आलेली आहेत.

प्रकल्पांतर्गत वापरण्यात आलेल्या आर.सी.सी. पाईप, चेंबर फ्रेम कव्हर व इतर बांधकाम साहित्याची गुणवत्ता चाचण्या वेळोवेळी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेल्या आहेत. योजनेच्या कामाचे नियोजन करून तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे देखरेखीखाली झालेले असून सदर योजनेचे कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण करून काम गुणवत्तापुर्वक झाले असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच झालेल्या कामांच्या एकतिसाव्या धावत्या देयकापर्यंत रुपये ३९१.०२ कोटीची देयके अदा करण्यात आलेली आहेत.

(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत भुयारी गटार टप्पा-२ योजनेंतर्गत ६ मलशुद्धीकरण केंद्रे (एसटीपी) व ९ पंपिंग स्टेशन बांधणेचे काम अंतर्भूत नसून ४ मलशुद्धीकरण केंद्रे (एसटीपी) बांधणे व ७ ठिकाणी पंपिंग स्टेशन बांधणे व इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. संबंधित ठेकेदार यांना प्रकल्पांतर्गत झालेल्या कामांचे त्रयस्थ संस्था लेखापरीक्षण करूनच देयके अदा करण्यात आलेली असून कुठल्याही प्रकारे आगाऊ जादा देयके अदा करण्यात आलेली नाहीत.
(३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या भुयारी गटार प्रकल्पाच्या कामाचे प्रथम धावते देयक ते सहावे धावते देयकांतर्गत झालेल्या कामाचे त्रयस्थ संस्था तांत्रिक लेखापरीक्षण आय.आय.टी, मुंबई यांच्याकडून करण्यात आलेले आहे व पुढील सातवे धावते देयक ते एकतीसावे देयकापर्यंत झालेल्या कामाचे त्रयस्थ संस्था तांत्रिक लेखापरीक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेकडून करण्यात आलेले असून काम समाधानकारक आल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित ठेकेदारास आजमितीस एकतिसाव्या धावत्या देयकापोटी रुपये ३९१.०२ कोटी मात्रची देयके प्रदान करण्यात आलेली आहेत.
(४) योजनेच्या कामांतर्गत मलवाहिन्या अंथरणे करीता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची दुरुस्ती वेळोवेळी करण्यात आलेली असून मागील पावसाळयापुर्वी विविध ठिकाणी मलवाहिनी अंथरणे कामी खोदाई करण्यात आलेले सुमारे १.९० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची WBM पध्दतीने दुरुस्ती करण्यात आलेली असून पावसाळयामुळे डांबरीकरण करणे शक्य झाले नसून सद्य:स्थितीत डांबरीकरणाद्वारे सदरचे रस्ते पूर्ववत करण्याचे भिवंडी महानगरपालिकेचे नियोजन असून योजनेंतर्गत मलवाहिनी अंथरणे कामी खोदण्यात आलेल्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे अपघात झाल्याची तक्रार भिवंडी निजामपूर महानगरपालिकेस प्राप्त नसल्याचे आयुक्त, भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(५) व (६) भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या भुयारी गटार प्रकल्पाच्या अनुषंगाने प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या अहवालाचे अवलोकन केले असता सदर प्रकल्पाचे काम गुणवत्तापूर्ण झाले असल्याचे आय.आय.टी., मुंबई व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण अहवालानुसार निदर्शनास येते तसेच, सदर प्रकल्पातील कंत्राटदारास अदा करण्यात आलेली देयके सदर त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर दिल्याचे दिसून येते.

-----------------

## कोकण विभागातील दिव्यांगाकरीता कार्यरत असणाऱ्या विशेष शाळांना अनुदान मंजूर करण्याबाबत

**(२८) * २२११५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये दिव्यांग कल्याण विभागांतर्गत सुरू असलेल्या विशेष शाळांचे प्रमाण अतिशय कमी असून सदर विशेष शाळा वर्षानुवर्षे विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतानाही त्यांना अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माऊली कर्णबधीर विद्यालय, आरोस (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) व श्री गुरूदेव बहुउद्देशीय सामाजिक संस्था दिव्य विद्यालय अंतर्गत गुलमोहर अंध व मतिमंद मुलांची निवासी शाळा, जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) या विशेष शाळांना विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करण्याबाबत संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी शासनास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये सामाजिक न्याय अंतर्गत सुरू असलेल्या विशेष शाळांना विशेष बाब म्हणून तातडीने अनुदान मंजूर होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोकण विभागात एकूण ७८ विशेष उपक्रम दिव्यांगांसाठी कार्यरत असून त्यातील ४३ उपक्रम हे अनुदानित असून उर्वरीत ३५ उपक्रम हे विनाअनुदानित आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

माऊली कर्णबधीर विद्यालय, आरोस (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) ही शाळा अनुदानित तत्वावर कार्यरत आहे. त्याशिवाय, श्री गुरूदेव बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित गुलमोहर अंध मुलांची निवासी शाळा व गुलमोहर मतिमंद मुलांची निवासी शाळा, जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) या विशेष शाळांना विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करण्याबाबत मा.श्री.रविंद्र चव्हाण, मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांनी त्यांच्या दिनांक ११/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.
(३) राज्यातील दिव्यांगांच्या विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित विशेष शाळा, कर्मशाळा (प्रशिक्षण केंद्र) आणि अनाथ मतिमंद बालगृहे यांना अनुदान तत्वावर आणण्यासाठी मान्यता देण्याबाबतच्या धोरणाचा मसुदा विभागाकडून तयार करण्यात आला असून त्यास शासनाच्या इतर विभागाच्या व मा.मंत्रीमंडळाच्या मान्यता घेण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर त्यातील निकषांनुसार पात्र उपक्रमांना अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ब्रिटिशकालीन जलाशयाच्या पुनर्बांधणीकरीता हँगिंग गार्डन बंद करणार असल्याबाबत

**(२९)** * **२१९१६ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रिटिशकालीन जलाशयाचा पुनर्विकास प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठरविल्याप्रमाणे करावयाचा झाल्यास म्हातारीच्या बूटासाठी प्रसिध्द असलेले मलबार हिल (मुंबई) येथील हँगिंग गार्डन ७ वर्षासाठी बंद केले जाण्याची शक्यता असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मलबारवरील टेरेस गार्डन म्हणजेच फिरोजशहा मेहता उद्यान तथा हँगिंग गार्डनच्या खाली असलेल्या ब्रिटिशकालीन जलाशयाची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलाशयातून ग्रँट रोड, ताडदेव, गिरगांव, चंदनवाडी, मंत्रालय, चर्चगेट, सीएसएमटी परिसरात पाणीपुरवठा केला जात असून सन १८८७ मध्ये बांधलेल्या व सव्वा शतकापासून अधिक काळ सेवा बजावलेल्या या जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम प्रभावित लोकांना विश्वासामध्ये घेऊन करणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आजपावेतो कोणतेही काम नागरिकांना विश्वासामध्ये घेऊन करण्यात न येण्याची कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "डी" विभागातील फिरोजशाह मेहता गार्डन येथील १४० वर्षे जुन्या व १४७.७८ दशलक्ष लिटर क्षमतेच्या मलबार टेकडी जलाशयाचे आयुर्मान संपुष्टात आले असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर जलाशयाच्या ०१पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम ६ टप्प्यांमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच सदर काम पूर्ण होण्याचा कालावधी ६० महिने (पावसाळा वगळून) असल्यामुळे फिरोजशाह मेहता उद्यान तथा हॅंगिंग गार्डन संपूर्ण ७ वर्षांच्या कालावधीसाठी बंद केले जाणार, हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत मलबार हिल जलाशयामधून दक्षिण मुंबईच्या अतिमहत्वाच्या भागांना पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे मूळ जलाशयाच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी सदर भागांचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे अत्यावश्यक आहे. यासाठी सदर कंत्राटात मूळ जलाशयाच्या पश्चिम बाजूस पर्यायी जलाशय बांधून त्याद्वारे सद्य:स्थितीतील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचे नियोजित करण्यात आले आहे. त्यासाठी सदर नियोजित पर्यायी जलाशयाच्या ठिकाणी बाधित होणाऱ्या जल उदंचन केंद्र व विद्युत उपकेंद्राचे निष्कासन करण्याकरीता प्रथम मलबार टेकडी जलाशयाच्या शेजारी असलेल्या मलबार टेकडी जलाशय क्र. २ च्या जवळ पर्यायी उदंचन केंद्राची पुनर्बांधणी करुन कार्यान्वित करणे व विद्युत उपकेंद्र बांधणे, तसेच नवीन विद्युत उपकेंद्राच्या नियोजित ठिकाणी बाधित होणाऱ्या सुरक्षा रक्षक कक्ष इमारतीचे विस्थापन / स्थानांतर करणे, त्याबरोबरच नियोजित नवीन जलाशयाच्या जागेत असणाऱ्या जलवाहिनींचे योग्य रितीने विस्थापन / स्थानांतर करुन सदर जागा मोकळी करण्याचे व त्यानंतर मोकळया झालेल्या जागेवर प्रथम पर्यायी जलाशयाचे बांधकाम करुन त्यानंतरच मूळ जलाशयाच्या पुनर्बांधणीच्या कामाला सुरुवात होणार आहे.

पहिल्या टप्प्यातील प्रस्तावित कामे पूर्ण होईपर्यंत फिरोजशाह मेहता उद्यान तथा हॅंगिंग गार्डन कार्यान्वित राहणार आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सदर कामाच्या निविदा मागविण्यापूर्वी १५ दिवस अगोदर सदर कामाचा प्रस्ताव नागरिकांच्या सूचना मागविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिनांक २५ मे, २०२१ रोजी प्रकाशित करण्यात आला होता.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर फेरीवाला समितीने ३२ हजार फेरीवाल्यांना मंजुरी दिल्याबाबत

**(३०) * २२५१९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत व्यवसाय करु शकतील अशा ३२ हजार फेरीवाल्यांच्या यादीला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर फेरीवाला समितीने (TVC) नुकतीच मंजुरी दिली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारच्या पदपथ विक्रेते अधिनियमानुसार शासनाने पदपथ विक्रेता योजना जाहीर केली असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१४ मध्ये फेरीवाल्यांची नोंदणी करण्यास सुरुवात करुन या सर्वेक्षणादरम्यान फेरीवाल्यांचे लाखो अर्ज आले असतानाही केवळ ३२ हजार फेरीवालेच पात्र ठरविण्यात आल्याने ऊर्वरीत फेरीवाल्यांवर अन्याय होत असल्याची भावना फेरीवाला संघटनांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या पदपथ विक्रेता योजनेंतर्गत महागनरपालिका सुमारे दीड लाख फेरीवाल्यांना कर्ज वाटप करते मात्र फेरीवाल्यांची अंतिम यादी मंजूर करताना या कर्जधारक फेरीवाल्यांचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन त्यांना पात्र ठरविण्यात येऊन त्याबाबतचे निकष जाहीर करण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरीत फेरीवाल्यांना पात्र ठरविण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व २) हे खरे आहे.

(३) व (४) पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण व पात्रता या बाबी तसेच प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत पथविक्रेत्यांना कर्जवाटप य दोन्ही बाबींसाठी वेगवेगळे निकष आहेत.

दिनांक १ मे, २०१४ रोजी केंद्र शासनाने पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ लागू करण्यात आला असून, सदर अधिनियमातील कलम ३६ (१) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन)(महाराष्ट्र) नियम २०१६, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केला आहे.

मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिलेल्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे जुलै, २०१४ मध्ये करण्यात आलेले पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण ग्राह्य धरण्यात आले आहे.

महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन)(महाराष्ट्र) नियम २०१६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत "नगर पथविक्रेता समिती" गठीत करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. नगर पथविक्रेता समिती अस्तित्वात आल्यानंतर सदर समितीमार्फत पात्रता निकष ठरवले जाणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास नुसार बांधकाम परवानगीसाठी लागणारा कालावधी कमी करण्याबाबत

**(३१) * २२५५० श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास (NIT) मध्ये लेआउट, इमारती, लॉजिस्टिक पार्क, फायर ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी), टीडीआर प्रक्रिया यांच्या मंजुरी प्रक्रियेस ६ महिने किंवा त्याहूनही जास्त कालावधी लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेकदा बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर (BPMS) क्रॅश होऊन ते १५-१५ दिवस बंद राहिल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया संथगतीने होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर महानगरपालिका (NMC) आणि नागपूर सुधार प्रन्यास (NIT) यांना यासंदर्भात सूचना देणे, सर्व बांधकाम परवानग्या विहित वेळत पूर्ण करणे तसेच बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर (BPMS) योग्य पध्दतीने कार्यान्वित करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांच्या तक्रारी आणि लोकप्रतिनिधींची मागणी यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिकेद्वारामंजूर UDCPR मधील तरतूदीनुसार विहीत मुदतीमध्ये बांधकाम परवानगी आणि अभिन्यास नकाशांना मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अर्जदारांनी सादर केलेले बांधकाम परवानगी प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अशा तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण प्रकरणांत BPMS प्रणालीव्दारा विहीत मुदतीत बांधकाम परवानगी निर्गमित करणेत येते. नागपूर महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१/०१/२०२२ ते आजतागायत १३६६ बांधकाम प्रकरणे यांना BPMS ऑनलाईन प्रणालीद्वारे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

जी प्रकरणे कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत अशा बांधकाम परवानगी प्रकरणांमध्ये कागदपत्रांची पूर्तता करुन सदर प्रकरण आर्किटेक्टयांचे लॉगइन मार्फत पुन्हा सादर केल्यानंतर अशा परिपूर्ण प्रस्तावांना BPMS ऑनलाईन प्रणालीद्वारे विहित मुदतीत मंजूरीची कार्यवाही करण्यात येते

तसेच, अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक असलेल्या विशेष इमारतीच्या (Special Buidling) प्रकरणांकरीता अग्निशमन विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र अर्जदाराने प्राप्त करून सदर नाहरकत प्रमाणपत्र अर्जदार (किंवा अर्जदाराचे आर्किटेक्ट) नगररचना विभागास ऑनलाईन पध्दतीने सादर (upload) केलेनंतर अशा प्रकरणी विहीत मुदतीत कार्यवाही करणेत येते.

मंजूर UDCPR नियमावलीतील विनियम क्र.११.२ मधील तरतूदीनूसार टिडीआर बाबतची कार्यवाही अर्जदाराने संपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव सादर केल्यास त्यावर विहीत मुदतीत कार्यवाही करणेत येते.

बांधकाम परवानगी प्रक्रिया संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने दिल्या जात असल्याने बांधकाम परवानगी प्रकरणे विनाविलंब निकाली काढण्यात येतात.अशी प्रकरणे विहित मुदतीत मंजूर केली जात असून, त्याचा कमाल कालावधी ४५ दिवसांत प्रकरणे निकाली काढली जात आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, अर्जदार यांनी ऑनलाईन पध्दतीने आर्किटेक्ट यांच्यामार्फत सादर केलेल्या बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यास वा नकाशात काही त्रृटी असल्यास अशी प्रकरणे Reassing केलेनंतर संबंधित आर्किटेक्ट / अर्जदार यांना सदर त्रृटयांबाबत प्रकरण Reassing केले असल्याचे लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविले जाते. तथापि, Reassingकेलेनंतर सदर प्रकरणी पुर्ततेकरीता आर्किटेक्ट यांच्या लॉगइनमध्ये बरेच दिवस प्रलंबित असतात. तथापि, आर्किटेक्ट मार्फत त्रृटयांची पुर्तता करून प्रकरण पुन्हा सादर झाल्यानंतर अशी प्रकरणे विहीत मुदतीत मंजूर केली जात असून त्याचा कमाल कालावधी ४५ दिवसात प्रकरण निकाली काढलेली आहेत.

तसेच जी प्रकरणे कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत. अशा बांधकाम परवानगी प्रकरणांमध्ये कागदपत्रांची पूर्तता करुन सदर प्रकरण आर्किटेक्टयांचे लॉगइनमार्फत पुन्हा सादर केल्यानंतर अशा परीपूर्ण प्रस्तावांना BPMS ऑनलाईन प्रणालीद्वारे विहित मुदतीत मंजूरीची कार्यवाही करण्यात येते.

नागपूर महानगरपालिकेमध्ये BPMS प्रणाली पूर्ण क्षमतेने काम करीत असून, विनाविलंब बांधकाम परवानगीची प्रकरणे निकाली काढली जात असून, नागपूर सुधारप्रन्यास क्षेत्रामध्ये अधिकत्तम भाग हा अनधिकृत / गुंठेवारी अभिन्यासाअंतर्गत येत असल्याने सदर प्रकरणी अभिन्यासातील गुंठेवारीअंतर्गत नियमित केलेल्या भूखंडावरील इमारत बाधकाम नकाशे विहीत मूदतीत मंजूर / नामंजूरीची कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासाकडून करण्यात येत आहे.

BPMS प्रणालीबाबत माहिती अधिकार अर्ज नागपूर महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येते.

(३) होय, हे खरे आहे.

BPMS सॉफ्टवेअर प्रणालीमुळे येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यात याव्या किंवा पूर्ववत ऑफलाईन पध्दतीने भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी परवानगी मिळावी या आशयाचे निवेदन लोकप्रतिनिधीकडून शासनास प्राप्त झाले आहे. तसेच, क्रेडाई (नागपूर मेट्रो) या संस्थेने, देखील BPMS सॉफ्टवेअर प्रणालीची अंमलबजावणी करताना काही अडचणी येत असल्याबाबत शासनास निवेदने / विनंती अर्ज सादर केले आहेत.

(४) सद्य:स्थितीत राज्यातील विविध नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील सुरु असलेल्या BPMS सॉफ्टवेअर अद्यायावत करण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित अर्जदार / लोकप्रतिनिधी यांचे समावेत शासनस्तरावर नियमित बैठका घेण्यात येत असून, उद्धवणाऱ्या समस्या निकाली काढण्यात येत आहेत.

(५) विलंब झालेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा भाईंदर महानगरपालिकेकडून उद्यानासाठी आरक्षित जमिनीवर तरण तलाव बांधण्यात येत असल्याबाबत

**(३२) * २२५८३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा रोड येथील बुध्दविहारालगत असलेल्या मोकळया भूखंडावर मीरा-भाईंदर महानगरपालिकेने अडीच वर्षांपूर्वीच ‘ग्रीन यात्रा’ या सामाजिक संस्थेच्या मदतीने ‘मियावाकी’ पध्दतीने झाडे लावली असून महानगरपालिकेने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तरण तलाव उभारण्यासाठी ३ हजार २६७ मियावाकी झाडांची

कत्तल करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम विभागाने उपायुक्त, उद्यान यांच्याकडे झाडे तोडण्यासाठी परवानगी मागितली असून त्याबाबतची जाहीर नोटीसही दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मीरा रोड (पूर्व) येथील रामदेव पार्क हा भूखंड आरक्षण क्रमांक २३० म्हणून विकास आराखड्यात उद्यानासाठी आरक्षित असून सदर जागेवर तीन वर्षांपूर्वी सीएसआर फंडांमध्ये मियावाकी झाडे लावून तेथे असणारे हिरवेगार जंगल हे पर्यावरणाच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचे असून सदर योजनेसाठी नागरिकांनी देखील हातभर लावला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तीन वर्षानंतर उद्यानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा तरण तलाव उभारण्यासाठी नागरिकांनी कोणतीही मागणी केली नसतानाही महानगरपालिकेकडून तरण तलाव बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मीरा भाईंदर येथील उद्यानासाठी आरक्षित जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या तरण तलावासाठी इतर पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १८ परिसरातील उद्यानाच्या आरक्षण क्र. २३० या भूखंडावर ऑलम्पिक साईज तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधणेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.

त्यानुसार महानगरपालिकेने सदर कामाचा प्रस्ताव तयार करून विहीत प्रक्रिया केलेली होती. तथापि, सदर कामाच्या जागेवर झाडे असल्याने, सदर झाडे हटविण्यास विरोध झाल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात आलेला आहे.

(५) आरक्षण क्र. २३० या भूखंडाऐवजी आरक्षण क्र. १६९ या जागेवर तरण तलाव बांधण्यासाठी शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येऊर (जि.ठाणे) येथील अनधिकृत टर्फ क्लबवर ठाणे महानगरपालिकेने केलेल्या कारवाईबाबत

**(३३) * २२६६० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) येथील निसर्गरम्य परिसरात सुरू असलेल्या बेकायदा टर्फ क्लबवर ठाणे महानगरपालिका प्रशासनाने कारवाई केल्यामुळे टेनिस, क्रिकेट, फुटबॉल अशा खेळासाठी रात्री उशिरापर्यंत भाड्याने दिल्या जाणाऱ्या टर्फ क्लब चालकामध्ये भिती निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत येणाऱ्या येऊरमध्ये अनधिकृतरीत्या उभारलेल्या सात बंगल्यावरील ठाणे महानगरपालिकेने केलेल्या कारवाईच्या मोहिमेला दोन आठवडे मा.न्यायालयाने स्थगिती दिली आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, येऊर येथील नदीत बेकायदा बांधकामे, हॉटेल उभारले असूनही गत काही वर्षात कोणत्याही परवानगीशिवाय अधिकृत टर्फ क्लब बांधून त्या ठिकाणी प्रखर विद्युत प्रकाशझोतात क्रिकेट, टेनिस, फुटबॉलसारखे मैदानी खेळ खेळले जात असल्यामुळे स्थानिक, सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा पर्यावरण संस्थेच्या मदतीने यासंदर्भात तक्रारी केल्या असून याबाबतचा संपूर्ण अहवाल वन विभागास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे येथील येऊरमध्ये सुरु असलेल्या अनधिकृत टर्फ क्लबवर कोणती कारवाई केली तसेच वन विभागास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिकेमार्फत येऊर येथील टर्फ क्लबला सिल करण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाने स्थगिती आदेश दिली असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) व (४) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेकडून वन विभागास अवगत करण्यात आले आहे.

तथापि, वन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार येऊर येथील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यासंदर्भात ठाणे महानगरपालिका प्रशासनास सूचना देण्यात आल्या असून या क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलीस विभागास सूचित करण्यात आले आहे. दरम्यान येऊर येथील प्रवेशद्वार प्रचलित नियमानुसार (स्थानिक रहिवाशी इ. वगळता) सर्वांना रात्रीच्या वेळी ये-जा करण्याकरीता पूर्णपणे बंद करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत

**(३४) * २२७१२ श्री.सत्यजीत तांबे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १७०६९ ला दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक करण्यात यावे अशी मागणी कामगार नेते डॉ.बाबा आढाव व अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी निवेदने, आंदोलने करुन शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारकासाठी मिळकतीचे मालक/विकासक/भाडेकरु यांच्यासमवेत मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत पुनर्वसनासह स्मारकाचा आराखडा तयार करुन सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिडेवाडा या मिळकतीच्या भूसंपादनाची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरु असून यासंदर्भात उच्च न्यायालयाने पुणे महानगरपालिकेच्या बाजूने सकारात्मक निर्णय दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी झाला असून सदरील निर्णयामुळे सन २००६ पासून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक करण्याचा प्रलंबित कामाचा मार्ग सुकर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भारतातील पहिली मुलींची शाळा असलेल्या भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल W.P.No.३०९०/२०१० व W.P.NO.३५१९/२०१० या दाव्यांचा दिनांक १६/१०/२०२३ रोजीचा निकाल तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल SPL Diary No.४४९१९/२०२३ या दाव्याचा दिनांक ०२/११/२०२३ रोजी अंतिम निकाल पुणे महानगरपालिकेच्या बाजूने लागल्याने अंतिम निवाडा जाहीर होवून जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत सदर जागेचा ताबा दिनांक ०४/१२/२०२३ रोजी पुणे महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत वेगवेगळया ला.आर्किटेक्स यांच्याकडून भिडेवाडा स्मारकाच्या आराखड्याचे विविध पर्याय मागविण्यात आलेले असून त्यापैकी उचित पर्यायाची निवड करून, त्याप्रमाणे निविदा मागवून भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक बांधण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसुचित जाती प्रवर्गातील अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(३५) * २२१४३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसुचित जाती प्रवर्गातील २ हजार विद्यार्थी सन २०२१-२०२२ या वर्षात रुपये २ कोटी ६० लाख तर सन २०२२-२०२३ मधील ३१ हजार ४०० विद्यार्थी रुपये ९ कोटी २० लाख एवढ्या रकमेच्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले असल्याचे दिनांक ९ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्तीची प्रलंबित रक्कम सुमारे ११ कोटी ८० लाख इतकी असून सुमारे ३३,४००विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणांसाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतून विद्यार्थी महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क भरतात अन्यथा अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण थांबविण्याची अथवा पहिल्या वर्षात शैक्षणिक शुल्क भरल्याशिवाय पुढील वर्गात प्रवेशासाठी महाविद्यालयाकडून अडवणूक होते हे लक्षात घेता, ३३ हजार ४०० विद्यार्थ्यांना त्यांची प्रलबित शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत हे खरे नाही.

माहे जुलै, २०२३ मध्ये सन २०२१-२२ मधील २००४ व सन २०२२-२३ मधील ३१४०० विद्यार्थ्यांचे अर्ज विभागामार्फत मंजूर झाले असून सदर मंजूर अर्जाची देयके निर्गमित होवून महाडिबीटी प्रणालीव्दारे वितरीत करण्यात येत आहे.

(२) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत हे खरे नाही.

माहे जुलै, २०२३ मध्ये सन २०२१-२२ मधील २००४ व सन २०२२-२३ मधील ३१४०० असे एकूण ३३,४०४ विद्यार्थ्यांचे अर्ज विभागामार्फत मंजूर झाले असून सदर मंजूर अर्जाची देयके निर्गमित होवून महाडिबीटी प्रणालीव्दारे वितरीत करण्यात येत आहे.

(३) माहे जुलै, २०२३ च्या दरम्यान राज्यातील ३३ हजार ४०० अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीचा राज्य हिस्सा ४० टक्के सुमारे ११ कोटी ८० लाख सद्य:स्थितीत वितरीत करण्यात आला आहे. या दरम्यान सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या वर्षातील विद्यार्थीस्तरावर व महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले अर्ज देखील मंजूर करण्यात आलेले आहे.

केंद्र हिस्सा ६०% शिष्यवृत्तीची रक्कम केंद्र शासनामार्फत अदा होईल व त्यादरम्यान विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडवणूक करण्यात येऊ नये या स्वरुपाचे शासन परिपत्रक दिनांक ०६/०९/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

Commented [E1]:

## पुण्यातील पिंपरी शहरातील रेड झोनमध्ये अनधिकृतरित्या बांधकामे करुन विक्री सुरु असल्याबाबत

**(३६)** * **२१९८४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील पिंपरी शहरातील दिघी मॅगझिन आणि देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरीमुळे दिघी,भोसरी,गोशी,वडमुखवाडी,तळवडे, चिखली,निगडी, यमुननगर, रुपीनगर या रेड झोन भागातील भूसंपादन केंद्र शासनाने केले असतानाही या भागात अनधिकृतरित्या बांधकामे करुन त्यांची विक्री करण्याचे प्रकार सुरु असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये उघडकीस आले आहे हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने सदर अवैध बांधकामे पाडण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत दिघी मॅगझीन व देहू रोड ॲम्यूनेशन डेपोमुळे शहरातील दिघी, बोपखेल, मोशी, वडमुखवाडी, भोसरी, चिखली, निगडी, यमुनानगर, रूपीनगर, तळवडे या भागात विकास करण्यास प्रतिबंधीत क्षेत्र (रेड झोन) आहे. सदर क्षेत्रात विकासास प्रतिबंध असल्याने बांधकाम परवानगी देण्यात येत नाही.

तथापि, सदर भागात अनधिकृत बांधकामे होत आहेत. तसेच या भागातील अनधिकृत भूखंडांची अनधिकृतपणे खरेदी विक्री होवून त्यावर अनधिकृतपणे बांधकामे होत असल्याच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२) या अनधिकृत भूखंडाची होत असलेल्या खरेदी-विक्री च्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना रेड झोन हद्दीतील अनधिकृत लेआऊट (Plotting) मधील जागेची खरेदी विक्रीचे दस्त नोंदविण्यात येऊ नये, असे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिनांक १४/०५/२०१८, दिनांक १८/१२/२०१८ व दिनांक ०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रांन्वये कळविलेले आहे.

तसेच या भागातील अनिधकृत बांधकामांवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविलेले आहे.

सदर रेड झोन मधील अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७७/२००६ दाखल असून सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोळगांव (जि.पालघर) येथील सिडकोने बांधलेल्या मुख्यालय संकुलातील इमारतींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३७)** * **२१९६१ ॲड.अनिल परब, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळगांव (जि.पालघर) येथे जिल्हा मुख्यालयाच्या उभारणीसाठी रुपये ३१० कोटीपेक्षा अधिक निधी खर्च करुन सर्व शासकीय कार्यालयांना सामावून घेणाऱ्या या १०३ हेक्टर मुख्यालयात जवळपास ८२ हजार चौरस मीटरचे बांधकाम करून सिडकोतर्फे नेमलेल्या ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने या इमारती कार्यरत होऊन एक ते दोन वर्षाच्या कालावधीत देखभाल दुरुस्ती अभावी संकुलातील अनेक इमारतींची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुख्यालय उभारण्यासाठी शासनाकडे निधी नसल्याने जिल्हा मुख्यालय संकुल उभारणे व इतर पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी सिडकोला काम देण्यात आले होते परंतु, या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीचे ठेकेदार जिल्हा प्रशासन सिडको यापैकी कोणीच जबाबदारी घेत नसल्याने मुख्यालयाची दुरवस्था होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा मुख्यालय संकुलाच्या कामास माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये सुरुवात करण्यात आली असून अंतर्गत सजावटीच्या बदल्यात नव्याने अतिरिक्त जमीन सिडकोला देणे, अंतर्गत सजावटीचे साहित्य खरेदी करणे इत्यादी कामांना विलंब झाल्याने माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये संकुलातील प्रमुख तीन कार्यालय नागरिकांसाठी सुरू करुन प्रशासकीय इमारती सुरू होण्यासाठी आणखी दीड वर्ष कालावधी लागल्यानंतरही अनेक कार्यालये प्रत्यक्षात कार्यरत नसल्याचे दिसून येत आहे, हेही खरे आहे काय?
(४) असल्यास, सिडकोने या इमारतींच्या पाहणीसाठी समिती नेमून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या असून या पाहणी समितीने जिल्हा मुख्यालयातील इमारतींची व बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणांची पाहणी करून करून त्रयस्थ संस्थेच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून अहवाल तयार केला असून पाहणी दौऱ्याची जिल्हा प्रशासनाला कोणत्याही प्रकारची सूचना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने सिडकोमार्फत बांधण्यात आलेल्या नविन जिल्हा मुख्यालय संकुलातील इमारतींना दोन वर्षातच तडे गेल्याने उक्त प्रकरणी शासनाने निकृष्ट बांधकामाप्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी समितीने चौकशी पूर्ण केली आहे काय, तसेच निकृष्ट बांधकामाप्रकरणी संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) पालघर जिल्हा मुख्यालयाच्या सुनियोजित विकासांतर्गत शासकीय जमिनीवर विविध विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हा स्तरीय शासकीय कार्यालयांच्या इमारती आणि कर्मचारी निवासस्थाने बांधणे व अनुषंगिक पायाभूत सुविधा करण्यासाठी सिडको महामंडळास पालघर "नवनगरविकास प्राधिकरण" म्हणून दिनांक ०१/१०/२०१६ रोजी घोषित करण्यात आले होते.

जिल्हा मुख्यालय संकुल अंतर्गत शासकीय कार्यालये जसे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा नविन प्रशासकीय इमारती या इमारतींचे स्थापत्य कामाचे कार्यादेश माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये सिडको महामंडळास देण्यात आले होते. सदर इमारती डिसेंबर, २०२० या कालावधीत पूर्ण करण्यात आल्या आहेत. सदर इमारती अंतर्गत सजावटीसह पूर्ण करुन सदर कार्यालयांचे कामकाज दिनांक ०१/०९/२०२१ पासून कार्यान्वित झालेले आहे. सदर इमारतींच्या सौंदर्य भागातील काही ठिकाणची फरशी निखळल्याचे आढळून आल्याने दुरुस्ती करुन पुर्ववत करण्यात आलेल्या आहेत.

यासंदर्भात सिडकोचे अतिरिक्त मुख्य अभियंता यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीमार्फत दिनांक ३०/०९/२०२३ व दिनांक ०६/१०/२०२३ रोजी मुख्यालयाची पाहणी करण्यात आली आहे. यासंदर्भात सदर समितीमार्फत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेरुळ (नवी मुंबई) येथील वैभवी डेव्हलपर्स या विकासकाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत

**(३८) * २१५०७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई) येथील श्री.यशवंत रामचंद्र घरत, श्री.सावळाराम रामचंद्र घरत व श्री.सुभाष रामचंद्र घरत या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिडकोने नेरुळ येथील सेक्टर २० मधील भुखंड क्रमांक ए-२० मधील ४९० चौ.मी चा भूखंड दिला असून सदरहू भूखंड ५०-५० टक्के इतक्या भागिदारी तत्वावर विकास करण्यासाठी वैभवी डेव्हलपर्सच्या मालकांना दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विकासकाने उक्त भूखंडावर बांधकाम पूर्ण केल्याने दिनांक २५ मे, २०२३ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून त्यानुसार विकासकाने भूखंड धारकांना त्यांच्या हिश्श्यातील गाळे व खोल्यांचा ताबा देणे आवश्यक असतानाही विकासकाने ताबा देण्यास नकार दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकाने बोगस कागदपत्रे सादर करुन सदरहू भूखंड परस्पर आपल्या नावे करुन भुखंडधारकांची फसवणूक केल्यामुळे भूखंड धारक पोलीस स्थानकात तक्रार करण्याकरीता गेल्यास सदरहू विकासकाचे पोलिसांशी संगनमत असल्याने संबंधित पोलीस स्थानकातील कर्मचारी तक्रार नोंद करण्याकडे जाणीवपुर्वक विलंब करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूखंड धारकांना त्यांच्या मालकीचे गाळे व खोल्यांचा ताबा देवून सदरहू विकासकावर फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करणे तसेच गुन्हा नोंद करण्यास जाणीवपुर्वक विलंब करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सिडकोने नेरुळ येथील सेक्टर २० मधील भुखंड क्र. ए-२०, क्षेत्र ४९० चौ.मी चा भुखंड श्री.यशवंत रामचंद्र घरत व इतर ७ या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या नावे दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी भाडेपट्टा करारनामाद्वारे वितरीत केला आहे. तद्नंतर सदर भूखंडाचा सिडकोने मे.वैभवी बिल्डर्स व डेव्हलपर्स तर्फे श्री.बाबुराव गजानन म्हात्रे यांचे नावे त्रिपक्षीय करारनामा दिनांक २६/०३/२०१९ रोजी केला आहे. सदर करारनाम्यातील अटींनुसार भागीदार म्हणून मूळ प्रकल्पग्रस्तांना ५०% हिस्सा देय असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यासंदर्भातील विकसन करारनामा (Development Agreement) बांधकाम परवाना प्रस्तावासोबत नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करण्यात आल्यानंतर तत्कालीन नियमावलीनुसार १.५ चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत रहिवास व वाणिज्य वापराकरीता बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे. सदर भूखंडावरील पूर्ण झालेल्या इमारतीच्या बांधकामास दिनांक २५ मे, २०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले आहे.
(३) व (४) अर्जदार श्री.सुभाष रामचंद्र घरत यांनी गैरअर्जदार मे.वैभवी बिल्डर्स व डेव्हलपर्स तर्फे श्री.बाबुराव गजानन म्हात्रे व इतर यांनी इमारतीमध्ये अनधिकृत शिरकाव करुन सदनिकांचा ताबा घेऊन भाडोत्री ठेवल्याबाबत नेरुळ पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दाखल केला होता.सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार यांचे सविस्तर जबाब नोंदवून मूळ अर्ज प्रकरणात समाविष्ट करुन तक्रार अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३९) * २१७९९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांनी काम न करता संगनमताने कोट्यवधी रुपयांची देयके काढून अनियमितता केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्यानातील झाडांना माती टाकणे, भर घालणे, झाडांना पाणी देणे या व अन्य कामांसाठी नवी मुंबई महानगरपालिकेने निविदा काढून काही कंपन्यांना ठेका देऊनही या कंपन्यांनी यातील कोणतीही कामे न केल्याचा आरोप स्थानिकांनी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे केलेल्या तक्रारीत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागात झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानाचे देखभाल, दुरूस्ती व संवर्धनाकरीता निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या कंत्राटदारांने आवश्यकतेपेक्षा कमी कामगारांचा वापर करून उद्यान विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने कोट्यावधी रूपयांची अनियमितता केली, अशा आशयाची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(३) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानाचे देखभाल, दुरस्ती व संवर्धनाकरीता सन २०२१ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून २ वर्षासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली होती.

- मुदत संपल्याने सदरची कामे सद्य:स्थितीत निविदा प्रक्रियेत असून यांस साधारणपणे दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, प्रशासक नवी मुंबई महानगरपालिका यांनी ठरावाद्वारे संबंधित कंत्राटदारांना मुदतवाढ दिलेली आहे.
- सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना उद्याने व उपवने देखभाल व दुरूस्तीच्या मापदंडाप्रमाणे २२०० चौ. मी. साठी एक कामगार याप्रमाणे मापदंड वापरण्यात आला आहे.
- सदरचे काम समाधानकारक झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदारास दंड आकारण्यात येतो. देयके अदा करतांना सदर दंडाची रक्कम वजा करून देयके अदा केली जातात. तसेच, कामगारांना कंत्राटदाराकडून पुरविल्या जाणाऱ्या सुविधांचीही पडताळणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व नवी मुंबईत परराज्यातून येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसेसची नोंदणी बनावट असल्याबाबत

**(४०) * २१६६९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई व मुंबईत परराज्यातून येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसेसची तपासणी करण्याची मोहीम नवी मुंबई, मुंबई उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सुरु करण्यात आली असून तपासणी करण्यात आलेल्या १७५ ट्रॅव्हल्सपैकी १८ ट्रॅव्हल्सची नोंदणी बनावट असल्याची बाब दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विना परवाना अवैधपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांच्या मनमानी कारभाराविरोधात आणि वाहन सुरक्षा नियमानुसार नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त बनावट नोंदणी प्रकरणी शासनाने चौकशी करुन परराज्यातून नवी मुंबईत तसेच मुंबईत येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसेसची तपासणी करुन बनावट नोंदणी असलेल्या वाहन चालकांवर गुन्हा दाखल करुन या सगळया बसेसची परवानगी आणि वाहनचालकांचा परवानाही रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती दंडात्मक कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबई आणि मुंबईत येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसेसची तपासणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई यांच्याकडून करण्यात आली असता सदर तपासणीमधील १७५ ट्रॅव्हल्स बस पैकी ११ ट्रॅव्हल्स बसची नोंदणी बोगस असल्याचे दिसून आले आहे.

(२) व (३) बोगस नोंदणी आढळून आलेल्या ११ ट्रॅव्हल्स बसविरुध्द सानपाडा पोलीस स्टेशन नवी मुंबई येथे प्रथम खबर अहवाल क्रमांक १३१/२०२३, दिनांक २१/०८/२०२३, भारतीय दंड विधान संहिता कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ११ ट्रॅव्हल्स बसेस वाहने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई येथे अटकावून ठेवण्यात आलेली आहेत तसेच सदर वाहने वाहन-४.० या संगणक प्रणालीवर ब्लॅकलिस्ट करण्यात आलेली आहेत.

बनावट नोंदणी झाल्याप्रकरणी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई यांनी अरूणाचल प्रदेश येथील नोंदणी प्राधिकाऱ्यास सदर वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र व परवाना रद्द करण्यासाठी दिनांक ११/१२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाल्याबाबत

**(४१) * २१०८७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आणिकगाव (चेंबूर) (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता सहावी आणि सातवीच्या १६ विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाली असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यान्ह भोजनातील पदार्थांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, सदरहू पदार्थांच्या तपासणीत काय निष्पन्न झाले आहे आणि तद्नुषंगाने संबंधित शाळा प्रशासन व पुरवठादार संस्था यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) चेंबूर परिसरातील आणिकगाव मनपा हिंदी शाळेमध्ये दिनांक १३/१०/२०२३ रोजी सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांना शांताई महिला औद्योगिक सहकारी संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या मध्यान्ह भोजनाच्या सेवनानंतर त्या शाळेतील १६ विद्यार्थ्यांना उलट्या सुरु झाल्या.

सदर १६ विद्यार्थ्यांना तात्काळ त्याच परिसरातील पं. मदनमोहन मालवीय शताब्दी मनपा रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्या व चक्करची लक्षणे असल्याचे रुग्णालयाच्या डॉक्टरांनी सांगितले.

(२) व (३) सदर घटनेनंतर संबंधित शाळेची व शांताई महिला संस्थेच्या स्वयंपाकगृहात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी करण्यात आली असून, सदर शाळेमध्ये पुरवठा करण्यात आलेल्या आहाराचा नमुना, पिण्याचे पाणी, शांताई महिला संस्थेच्या स्वयंपाकगृहातील आहाराचा नमुना, तांदूळ व पुरक आहाराचा नमुना बृहन्मुंबई महानगरपालिका प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आला. त्यानुसार स्वयंपाकगृहातील आहाराचे नमुने विहित निकषांनुसार असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले.

तसेच घटनेच्या दिवसाचा शाळेतून पाठविण्यात आलेला आहार शिळा झाल्यामुळे त्याचे विश्लेषण करणे शक्य झाले नसल्याचे प्रयोगशाळेने नमूद केले आहे. रुग्णालयात दाखल केलेल्या विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थ्यांचे अन्ननलिकेतील नमुने पोलिसांमार्फत फॉरेन्सिक लॅब, कलिना येथे पाठविण्यात आले असून, त्याचा अहवाल येणे अद्यापि बाकी आहे.

सदर बाब विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने शांताई महिला औद्योगिक सहकारी संस्था या आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेवर पोलिसांमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याबाबत तपास सुरु आहे. तसेच संबंधित आहार पुरवठादार संस्थेचे आहार पुरवठ्याचे काम घटनेच्या दिवसापासून काढून घेण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर शाळेतील विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपामध्ये इतर संस्थांमार्फत योजनेचा लाभ देण्यात येत असून विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नागरिकांसाठी बेस्ट बसच्या ताफ्यात वाढ करुन सोयी-सुविधायुक्त बेस्ट सेवा पुरविण्याबाबत

**(४२) * २१२३४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्टकडे पूर्वी ४ हजारांपेक्षा जास्त बसगाड्या उपलब्ध होत्या परंतु, सद्य:स्थितीत ३ हजार बसेसचा ताफा उपलब्ध असल्यामुळे बेस्ट सेवेवर याचा परिणाम होत असून, बस थांब्यावरील प्रवाशांचा बसच्या प्रतिक्षेचा कालावधी वाढल्याने विविध मार्गावरील बसेस वेळेत येत नसल्यामुळे नागरिकांना खाजगी वाहतुकीचा पर्याय निवडावा लागत असून त्यांना जादाचे पैसे मोजावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील दुसरी जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या बेस्ट बसच्या ताफ्यात अधिकच्या बसेस समाविष्ट करण्याकरीता बेस्ट उपक्रम स्वत: बस गाड्या खरेदी करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील बेस्टच्या वातानुकूलीत बसगाड्या पेटण्याचे प्रमाण वाढले असल्यामुळे प्रवाशांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून या बसगाड्यांची योग्य देखभाल होत नाही तसेच दुरुस्तीसाठी साहित्य उपलब्ध होत नसल्याने नादुरुस्त बस चालवाव्या लागत असल्याचे बस चालकांकडुन सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील बेस्ट बसच्या ताफ्यात अधिकच्या बसेस समाविष्ट करुन मुंबईतील नागरिकांना सोयी - सुविधायुक्त बेस्ट सेवा पुरविण्याकरीता तसेच बेस्टच्या वातानुकुलित बसेसची योग्य देखभाल दुरुस्ती करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सन २०१२ साली बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यामध्ये ४३८१ बसेस उपलब्ध होत्या, त्यापैकी १४२८ बसेसचे आयुर्मान संपल्यामुळे त्या मोडीत काढण्यात आल्या. सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात २९६६ बसेस उपलब्ध असून, भाडेतत्वावरील २१०० एकमजली व ९०० दुमजली बसेसचे कंत्राट देण्यात आले आहे. त्यापैकी ३३ एकमजली व ४७ दुमजली इलेक्ट्रिक बसेस बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल झाल्या आहेत आणि उर्वरित बसेस लवकरात लवकर बेस्ट उपक्रमाच्या सेवेत दाखल होणार आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) भाडेतत्वावरील ६ गाड्यांवर आगीच्या घटना मागील काळात घडल्या होत्या. त्यानुषंगाने बेस्ट उपक्रमाने सर्व बसेसची उत्पादकांकडून तपासणी करुन घेतली आहे. बसेस नादुरुस्त होणार नाहीत याची काळजी घेण्यात येत असल्याने नादुरुस्त बसेसचे प्रमाण कमी झाले आहे. तसेच, चालकांना नादुरुस्त बसेस चालवावयास सांगण्यात येत नाही.

बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यामध्ये अधिकच्या बसेस समाविष्ट करण्याकरीता बेस्ट उपक्रमाचा स्वत: बस गाड्या घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यानुषंगाने स्वमालकीच्या बसेस खरेदीसाठी निधीबाबत बेस्टमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव देण्यात आला असून, सदर निधी उपलब्ध झाल्यानंतर बेस्ट उपक्रमामार्फत २२३८ बसेस टप्प्याटप्प्याने खरेदी करण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ऑनलाईन आरटीआय प्रणाली सुरु करण्याबाबत

**(४३)** * **२२१८६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत सात वर्षापासून माहिती अधिकार अर्जांसाठी ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आलेली असून अद्यापही राज्यातील ७०० हुन अधिक कार्यालये ऑनलाईन प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य माहिती आयोगात मुख्य माहिती आयुक्तांचे पद रिक्त असून आयोगाने सन २०२१ व सन २०२२ चा वार्षिक अहवाल ही प्रकाशित केलेला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहिती आयोगातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात व उर्वरित कार्यालये ऑनलाईन माहिती अधिकार प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ऑनलाईन आरटीआय मध्ये सध्या येत असलेल्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करुन त्याचे सुरळीत संचालन करणे तसेच ऑनलाईन आरटीआय सुविधा तालुका पातळीपर्यंत राज्यातील सर्व तहसिल व पंचायत समिती कार्यालय आणि मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त सर्व कार्यालयात विस्तारित करणे यासाठी प्रकल्प निरीक्षण केंद्र (Project Monitoring Unit-PMU) स्थापन करण्याची कार्यवाही सध्या सुरु आहे.
(२) व (३) राज्य माहिती आयुक्त, मुख्यालय, मुंबई यांचे पद सध्या रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.सुनिल पोरवाल, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचेकडे सोपविण्यात आला आहे. तसेच सदर पद भरण्यासाठी दिनांक ०६/११/२०२३ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली असून इच्छुकांचे अर्ज दिनांक ०५/१२/२०२३ पर्यंत मागविण्यात आले होते. सदर प्रकरणी नियुक्ती संदर्भातील कार्यवाही सुरु आहे.

तसेच, सन २०२१ चा १६ वा वार्षिक अहवाल प्रकाशित करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून सन २०२२ चा वार्षिक अहवालाचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेच्या रुग्णालयातील ३ वर्षाच्या मुलीवरील उपचारादरम्यान दुर्लक्ष करणाऱ्या डॉक्टरवर कारवाई करणेबाबत

**(४४) * २२६२५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात न्यूमोनियाच्या उपचाराकरीता दाखल असलेल्या एका तीन वर्षाच्या मुलीच्या पायामध्ये सुई (गाइड वायर) अडकल्याची बाब दिनांक २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलीच्या पायामध्ये अडकलेली सुई काढण्यासाठी या मुलीवर शस्त्रक्रिया करावी लागणार असून सदरहू शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात संबंधित सर्जनदेखील उपलब्ध नसल्याने मुलीला पुढील वैद्यकीय उपचारासाठी जे. जे. रुग्णालयात स्थलांतरित करण्याचा निर्णय कळवा रुग्णालय प्रशासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, सदर मुलीवर उपचार करण्यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली तसेच उक्त प्रकरणी संबंधित मुलीवर वैद्यकीय उपचार करण्यात दुर्लक्ष करणाऱ्या डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर घटना घडल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिनांक २८/०९/२०२३ रोजी रुग्णालयाच्या बालरोग कक्षात अत्यावस्थ स्थितीत भरती झालेल्या ४ वर्षीय रुग्ण मुलीच्या उपचारादरम्यान intravenousaccess साठी पायात सेंट्रल लाईन टाकण्याच्या प्रक्रियेदरम्यान हालचाल झाल्याने guidewire स्लीप झाली. उक्त बाबी संदर्भात रुग्णाच्या पालकांना जाणिव करुन देण्यात आली होती. तथापि, तत्कालीन परिस्थितीमध्ये या गुंतागुंतीमध्ये रुग्णाच्या प्रकृतीस अपाय झालेला नाही. सदर बालिका कृत्रिम श्वसनावर असल्याने भूल देणे शक्य नव्हते. त्यामुळे तीची प्रकृती स्थिर झाल्यानंतर guidewire काढण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला.

तद्नंतर रुग्ण बालिकेच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यावर के.ई.एम. रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उक्त guidewire दिनांक ३०/१०/२०२३ रोजी काढण्यात आली. उपरोक्त बालिकेची प्रकृती स्थिर असून तीचा आजार पूर्णपणे संपुष्टात आल्याचे महानगरपालिकेने नमुद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जादूटोणा प्रकाराला आळा घालण्यासाठी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(४५) * २१४०७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंधश्रध्देचे निर्मुलन करण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२३ रोजी जादूटोणा प्रतिबंध विधेयक मंजूर केले असून अशाप्रकारे कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भातील नियम तयार केले नसल्याने त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जादूटोणा प्रकाराला प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कायदा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१३ रोजी "महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानूष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ जारी केला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उपहारगृहांमध्ये प्रवाशांना स्वस्त अल्पोपहार व 'नाथजल' मिळण्याबाबत

**(४६) * २१२८२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे : तारांकित प्रश्न क्रमांक २०४५२ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उपहारगृहांमध्ये प्रवाशांना रुपये ३०/ च्या दरामध्ये चहा, नाश्ता उपलब्ध व्हावा याकरीता स्वस्त अल्पोपहार योजना दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी सुरु करण्यात आली असून, सद्य:स्थितीत ही योजना बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाथजल हे बाटली बंद पाणी देखील कुलींग चार्जच्या नावाखाली छापिल दरापेक्षा अधिक दराने विकले जात असल्याच्या तक्रारी येत असून महामंडळ याकडे दुर्लक्ष करीत असल्याने त्याचा फायदा हॉटेल चालकांना होत असून, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्थानकात नाथजलची विक्री करणे बंधनकारक असतानाही हॉटेल मालक अन्य बाटली बंद पाण्याची विक्री करीत असल्यामुळे प्रवाशांना पाण्यासाठी जादा पैसे मोजावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मार्ग तपासणी पथकांनी, वाणिज्य आस्थापना पर्यवेक्षक आणि विभागातील अधिकाऱ्यांनी ३० रुपयातील नाश्ता आणि जादा दराने नाथजल विक्रीची खातरजमा करुन सदर अधिकृत थांबा ज्या विभागाच्या अखत्यारीत येतो त्या विभाग नियंत्रकास लेखी अहवाल सादर करावा, तसेच बस स्थानकावरील वाहतूक पर्यवेक्षक आणि आगार व्यवस्थापक यांची जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करावी असे आदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक यांनी पत्रक काढून दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रवाशांना स्वस्त अल्पोपहार व बाटली बंद पाणी 'नाथजल' मिळण्याच्यादृष्टीने कार्यवाही न करणाऱ्या हॉटेल मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) नाही.

रा.प. च्या अधिकृत हॉटेल थांब्यांवर केवळ नाथजल पाणी बाटलीची विक्री करण्याबाबत सूचना हॉटेल/वाणिज्य आस्थापना चालकांना देण्यात आल्या असून, रा.प. प्रवाशांना रुपये १५/- मध्ये १००० मिली नाथजल व रुपये ९/- मध्ये ५०० मिली नाथजल पाणी बाटली विक्रीसाठी उपलब्ध असल्याबाबतचे दरफलक बसस्थानकांच्या दर्शनी भागात व वाणिज्य आस्थापना शेजारी लावण्यात आलेले आहेत.
(३) नाही.

दिवाळी वर्दळीच्या पार्श्वभूमीवर रा.प. प्रवाशांना नाथजल नियमाप्रमाणे ठरलेल्या विक्री दरात उपलब्ध व्हावे, या दृष्टीने रा.प.महामंडळाने सर्व हॉटेल चालकांना, संबंधित विभागांना व नाथजलचा पुरवठा नियमित होण्याच्या दृष्टीने मे.शेळके बेव्हरेजेस प्रा.लि. यांना करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) व (५) प्रवाशी तक्रार असल्यास संबंधित हॉटेल मालकाकडून खुलासा मागविण्यात येतो. तसेच हॉटेलला तपासणी पथकाकडून/जबाबदार पर्यवेक्षक/अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष भेट देऊन तक्रारीच्या अनुषंगाने व वेळोवेळी तपासणी करण्यात येते, तपासणी दरम्यान त्रुटी आढळल्यास/रा.प.नियमांचा भंग झाला असल्यास, त्यावर रा.प.नियमानुसार कारवाई करण्यात येते.

-----------------

## मुंबई येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील छपाईचे काम करणाऱ्या रोजमर्टा कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करणेबाबत

**(४७) * २१६९७ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई येथील कार्यालयातील नोंदणी प्रमाणपत्र छपाईचे काम करणाऱ्या रोजमर्टा कंपनीने करारानुसार काम न केल्याने आयुक्त, परिवहन यांनी कंपनीला दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास कोट्यवधी रुपयांचा दंड ठोठावला असतानाही दंडाची रक्कम वसूल करताना त्यामध्ये कपात करण्यात येऊन अद्याप दंडाच्या रकमेची वसुली करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीसमवेत केलेल्या करारामध्ये प्रत्येक प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये नोंदणी प्रमाणपत्राच्या छपाईस उशीर झाल्यास, साहित्याचा तुटवडा पडल्यास, सॉफ्टवेअर, हार्डवेअरचा पुरवठा न केल्यास त्याशिवाय कंत्राट करारातील नियमांची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यास दैनंदिन दंडाच्या रकमेची तरतूद असूनही सदर रकमेत कपात करण्याची व अद्याप रक्कम वसूल न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राट करारातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांकडून दंडाची रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) विभागामार्फत परिवहन कार्यालयांमध्ये नोंदणी प्रमाणपत्र छपाईकरीता मे.रोजमर्टा यांची नियुक्ती करण्यात आली होती.

सदर कामासाठी करारातील तरतूदींची अंमलबजावणी न केल्यामुळे सर्व परिवहन कार्यालयांकडून माहिती प्राप्त करुन मे.रोजमर्टा कंपनीला नोटीस बजावून एकूण रुपये १,१३,३१,१६७/- इतका दंड आकारण्यात आला आहे. आजपर्यंत मे.रोजमर्टा कंपनीकडून एकूण रुपये १२,२६,०७९/- इतका दंड वसूल करण्यात आला असून उर्वरित दंडाची रक्कम वसूल करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील आधारवाडी तुरुंगाच्या संरक्षक भिंतीलगत अनधिकृत बांधकामे केली जात असल्याबाबत

**(४८) * २२१२१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण येथील आधारवाडी (जि.ठाणे) तुरुंगाच्या संरक्षक भिंतीपासून दीडशे मीटर अंतरावर बेकायदा बांधकामे केली जात असून भविष्यात कारागृहाचा विस्तार करण्यासाठी बेकायदा बांधकामांचा अडसर निर्माण होऊ शकत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारागृहातील कैद्यांची वाढती संख्या पाहता कारागृहाचा विस्तार करणे आवश्यक आहे परंतु, सदरहू बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी कारवाई करण्याकडे महानगरपालिकेकडून दुर्लक्ष केले जात असल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेकडून नियमित पाहणी करण्यात येते. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी कोणतेही नवीन बांधकाम सुरू असल्याचे पाहणी दरम्यान निदर्शनास आले नाही.

- अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचे पाहणी दरम्यान निदर्शनास आल्यास, त्यावर महानगरपालिकेमार्फत नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येते.

(३) आरक्षण क्र. ३६ जेलचा विस्तार या आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ १,५३,००० चौ. मी. इतके आहे. सदर क्षेत्रापैकी ५८४६८ चौ. मी. इतके क्षेत्र कारागृह प्रशासनास हस्तांतरीत केले असून, १८,७६० चौ. मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

- आरक्षणामधील उर्वरित ७५,७७१ चौ. मी. एवढे क्षेत्र अद्यापही महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले नाही.
- महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रावरती कोणतेही अतिक्रमण नाही. कारागृह प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रावरती ४ बांधकामे, दर्गा व कातकरी वस्ती अशी १५ वर्षापूर्वीची जुनी बांधकामे आहेत.
- सदर बांधकामे निष्कासित करण्यासाठी कारागृह प्रशासनास कळविले असून, सदर अतिक्रमणे काढणेकामी महानगरपालिकेमार्फत आवश्यक मनुष्यबळ व यंत्र सामुग्री पुरविण्याचे आश्वासित केले आहे.
- आरक्षणामधील अद्याप महानगरपालिकेच्या ताब्यात न आलेले क्षेत्र हे खाजगी मालकीचे असून, तेथे सद्य:स्थितीत अस्तित्वातील जुनी बांधकामे आहेत. तेथे कोणतेही नवीन बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माटुंगा एफ-उत्तर विभाग कार्यालयाच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात येणार असल्याबाबत

**(४९)** * **२१९३१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बहुतांश कंत्राटदार हे गैरव्यवहार करत असून महानगरपालिकेच्या माटुंगा एफ-उत्तर विभाग कार्यालयाची नवीन २० मजली इमारत उभारण्याबाबत तयार करण्यात असलेल्या आराखड्यानुसार निविदा प्रक्रियाही राबवण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माटुंगा एफ विभाग कार्यालयाची सद्य:स्थितीतील इमारतीच्या दुरुस्तीसाठी रुपये ५ कोटी खर्च करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या माटुंगा एफ-उत्तर विभाग कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीचा निर्णय होऊनही त्याच कार्यालयाच्या दुरुस्तीवर रुपये ५ कोटी खर्च करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बहुतांश कंत्राटदार हे गैरव्यवहार करत असल्याची बाब खरी नसून महानगरपालिकेच्या माटुंगा एफ-उत्तर विभाग कार्यालयाची नवीन २० मजली इमारत उभारण्यासाठी आराखडे तयार करण्यात येत असल्याची बाब खरी आहे.

(२) माटुंगा एफ विभाग कार्यालयाच्या सद्य:स्थितीतील इमारतीच्या दुरुस्तीसाठीच्या कामाची कंत्राट किंमत रुपये ४,१८,११,२३८/- (स्थापत्य व विद्युत) इतकी आहे.

(३) या प्रकरणी विद्यमान एफ-उत्तर विभाग कार्यालयाच्या शेजारील मोकळ्या जागेत सदर विभाग कार्यालयाचे पुनर्विकास करण्याच्या प्रस्तावाबाबत महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ विभागाने आराखडे बनविले आहत. तथापि, सदर प्रस्ताव अद्याप प्राथमिक अवस्थेत आहे. आराखड्यांना उपभोक्ता विभागाची मंजुरी मिळणे, पुनर्विकासाचे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा मागविणे आदी प्राथमिक कामे पूर्ण झाल्यावरच पुनर्विकासाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू होणे अपेक्षित आहे. दरम्यानच्या काळात विद्यमान इमारतीचा वापर विभाग कार्यालयाकरीता केला जाणार असल्यामुळे इमारत सुरक्षित, स्थिर व वापरायोग्य स्थितीत ठेवणे आवश्यक असल्यामुळे नोंदणीकृत संरचनात्मक सल्लागारांनी सुचविलेल्या अत्यावश्यक दुरुस्त्या करण्यासाठी महानगरपालिकेच्या इमारत परिरक्षण खात्यामार्फत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांजूर (मुंबई) येथे मेट्रोसाठी कारशेड बांधण्याच्या निर्णयाबाबत

**(५०) * २२५२९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो ६ चे कारशेड कांजूर (कांजूरमार्ग,मुंबई) येथे बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रो ६ च्या कारशेडसाठी कांजूरमध्ये १५ हेक्टर जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश शासनाने मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कांजूर मेट्रो कारशेड बांधण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नगरविकास विभागाच्या दिनांक २१/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई मेट्रो मार्ग-६ प्रकल्पाच्या अंमलबजावणीस तसेच या प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी कांजूरमार्ग येथे आगार (कारशेड डेपो) उभारण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १७/०४/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मौजे कांजूर मधील न.भू.प्र. ६५७अ येथील १५ हेक्टर जमिनीचा आगाऊ ताबा प्राधिकरणास दिला आहे.

(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई मेट्रो मार्ग-६ प्रकल्पाच्या कारशेड डेपोच्या बांधकामासाठी दिनांक १७/१०/२०२३ निविदा प्रसिध्द करण्यात आली असून सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रातील कंपन्यांकडून रसायनमिश्रीत पाणी नदीपात्रात सोडण्यात येत असल्याबाबत

**(५१) * २२५९३ श्री.जयंत पाटील, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रोहा धाटाव एमआयडीसी क्षेत्रातील दिपक नायट्रेट प्रा.लि. या कंपनीच्या जागेतून दुर्गंधीयुक्त सांडपाणी मोठ्या प्रमाणात वाहत असून या कंपनीच्या प्लॉट नंबर ५३ मधील मोकळ्या जागेत अवैध कोळसा साठा व इतर साहित्य ठेवण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, कंपनीच्या संरक्षण भिंतीच्या होलमधून दुर्गंधीयुक्त पाणी मुख्य रस्त्यावर आल्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प होणे, विषारी व दुर्गंधीयुक्त सांडपाणी, घातक रसायने असल्याने या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची समस्या निर्माण होणे तसेच या नाल्यातून नदीकडे जाणाऱ्या परिसरामध्ये सोडण्यात आलेल्या पाण्यामध्ये मासेही मृत्यूमुखी पडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खालापूर (जि.रायगड) एमआयडीसीमधील केमिकल कंपन्या केमिकल मिश्रित सांडपाणी पाताळगंगा नदीच्या पात्रात सोडल्यामुळे नदीचे पाणी विषारी बनले असून माशांसह अन्य जलचरांचा मृत्यू होऊन खोपोली पासून ते सावरोली पुलापर्यंत पाच किलोमीटरच्या नदीपात्रात मृत माशांचा खच पडलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रोहा धाटाव व खालापूर (जि.रायगड) एमआयडीसी परिसरातील केमिकल मिश्रित सांडपाणी नदीच्या पात्रात सोडून जलचरांसोबतच परिसरातील नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आणणाऱ्या कंपन्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

पाताळगंगा एमआयडीसी मधील उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेची उभारणी केली आहे व प्रक्रियायुक्त सांडपाणी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेतून प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत पाणी पाताळगंगा नदीत राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केलेल्या ठिकाणी मौजे खारपाडा येथे खारेपाणी क्षेत्रात सोडण्यात येते.

(४) सदर घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान मे. दिपक नायट्रेट प्रा. लि., प्लॉट क्र. ५३ अ, रोहा, धाटाव या ठिकाणी त्यांच्या प्लॉट क्र. १-८ व २६-३१ येथील उद्योगास उत्पादन प्रक्रियेसाठी लागणारा कच्चा माल, कोळसा व पक्का माल साठविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक ०५/१०/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे तसेच रुपये ५ लक्ष रूपये रकमेची बँकहमी जप्त करण्यात आली आहे.

तसेच, सदर उद्योगाच्या प्लॉट क्र. १-८ व २६-३१ या प्लांटला दिनांक ०५/१०/२०२३ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांजुरमार्ग (मुंबई) येथील कांजूर डम्पिंग ग्राउंडमधून येणारी दुर्गंधी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५२) * २२६६४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांजुरमार्ग (मुंबई) येथील कांजूर डम्पिंग ग्राउंडमधून येणाऱ्या दुर्गंधीमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने येथील नागरिकांनी रास्ता रोको केले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, डम्पिंग ग्राउंडमधून येणाऱ्या दुर्गंधीवर कायमचा उपाय काढावा, औषध फवारणी नियमित करावी अन्यथा डम्पिंग ग्राउंड कायमचे बंद करावे अशी मागणी करत पूर्व द्रुतगती महामार्ग रोखून धरण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कांजूर येथील डम्पिंग ग्रांउडमधून येणारी दुर्गंधी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागरिकांनी रास्ता रोको केले असल्याची बाब खरी आहे.

(२) नागरिकांनी पूर्व द्रुतगती मार्ग रोखून धरला होता, हे खरे आहे.

(३) कांजूर डम्पिंग ग्राऊंडमधील दुर्गंधी रोखण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात आल्या / येत आहेत:-

- भरावभूमीतून निर्माण होणारा वायू संकलित केला जातो व सदर वायुपासून प्रायोगिक तत्वावर वीज निर्मिती केली जाते. तसेच अतिरिक्त वायू फ्लेरींग सिस्टीमद्वारे पर्यावरणविषयक नियमानुसार जाळण्यात येतो.
- हवेशी संपर्कामुळे नागरी घन कचऱ्याची दुर्गंधी येऊ नये म्हणून कचऱ्यावर मातीचे आवरण टाकण्यात येते.
- कांजूर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील कचऱ्यावर इन्झाइम बेस द्रव्याचा फवारा दिवसरात्र करण्यात येतो.
- कांजूर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथील कचरा स्विकारण्यात येणाऱ्या ठिकाणच्या सभोवताली सुगंधी द्रव्याच्या फवारणीसाठी मिस्टींगची व्यवस्था केली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाच्या ठिकाणी पाच मिस्टींग कॅनन कार्यान्वित आहेत.

- कांजूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे सभोवतालच्या परिसरातील दुर्गंधीबाबत नागरिकांच्या तक्रारींचे तत्परतेने निवारण करण्यासाठी प्रचालकामार्फत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर कक्ष २४ X ७ कार्यान्वित असतो.
- दुर्गंधीबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी कंत्राटदारामार्फत सदर प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या पर्यावरण अधिकाऱ्यामार्फत तक्रारदाराच्या परिसरात प्रत्यक्ष भेट देऊन तक्रारीचे निवारण करण्यात येते.
- कांजूर प्रकल्पास महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाचे अधिकारी देखील वेळोवेळी भेटी देतात व दुर्गंधीच्या तक्रारीसंदर्भात करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची खातरजमा करतात.
- कांजूर येथे तक्रार निवारणासाठी स्थापन केलेल्या निवारण कक्षामार्फत, प्राप्त तक्रारींचे निराकरण त्वरीत करण्याबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून प्रचालकास वेळोवेळी सूचना देण्यात येतात व त्यावर काटेकोरपणे देखरेख करण्यात येते.
- सदर प्रकल्पाच्या नजिकच्या परिसरातील कन्नमवार को.ऑप.हौ.सो. असोसिएशन लि. आणि इतर तसेच वनशक्ती या अशासकीय संस्थेने सदर प्रकल्पाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका न्यायप्रविष्ट आहेत. सदर प्रकल्पाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई / मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशांचे पालन केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी (जि.पुणे) शहरातील प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांनी त्यांच्या मीटरमध्ये पारदर्शकता आणण्याबाबत

**(५३)** * **२१८७३ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) शहरातील प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांना मोटार वाहन कायद्यानुसार मीटर बंधनकारक करण्यात आलेले असतानाही काही रिक्षांमध्ये असलेले मीटर बंद असल्याने मनमानी भाडे आकारणी सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्षा चालक विविध कंपन्यांच्या मीटरमध्ये बिघाड करुन प्रवाशांना मनमानी पध्दतीने भाडे तक्ता दाखवून आर्थिक लूट करीत असून, ज्या रिक्षा चालकांनी नवीन भाडे रचनेप्रमाणे मीटरमध्ये बदल केलेला नाही त्यांच्या विरोधात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस बसविलेल्या वाहनांचे नियंत्रण करण्याकरीता मुख्य नियंत्रण कक्ष स्थापन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी (जि.पुणे) शहरातील प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांनी मोटार वाहन कायद्यानुसार मीटरमध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही. तथापि, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांनी खटुआ समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ०१/०९/२०२२ पासून रिक्षा भाडे वाढीस मंजूरी दिली आहे व त्यानुसार रिक्षा चालकांना नवीन भाडे रचनेप्रमाणे मीटर मध्ये बदल करण्याकरीता दिनांक ३१/०१/२०२३ पर्यंत मुदत देण्यात आली होती. विहीत मुदतीत बदल न करण्याऱ्या रिक्षा चालकांचे परवाने किमान ०१ दिवस ते कमाल ४० दिवसांसाठी निलंबित करणे किंवा प्रती दिवस रुपये ५०/- प्रमाणे दंड आकारण्यात येतो.
(२) होय.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड कार्यालयाने माहे ऑक्टोबर, २०२३ अखेर नोंदणी असलेल्या एकूण ३१,४७७ रिक्षांपैकी एकूण २१,१८७ रिक्षांचे मीटर पुन:प्रमाणकरण (Meter Calibration) केले आहे तसेच विहीत मुदतीनंतर माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत मीटर पुन:प्रमाणकरण (Meter Calibration) केलेल्या एकूण ३,७७२ रिक्षा मालकांकडून रुपये ५४,०१,८५०/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.
(३) व (४) व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस ही यंत्रणा ऑटोरिक्षा करीता अद्यापही अनिवार्य करण्यात आलेली नाही. तथापि, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत मोटार वाहन कायदा व तद्अनुषंगिक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरातील जलबोगद्याच्या दुरुस्तीची रक्कम विकासकाकडून वसूल करण्याबाबत

**(५४) * २१९५४ अ‍ॅड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक १९६०९ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या महानगरपालिकेच्या १०० मीटर खोल असलेल्या जलवाहिनीला ठाणे येथील वागळे औद्योगिक वसाहतीजवळ असणाऱ्या जलबोगद्याला एका व्यवसायिकाच्या बेकायदा बांधकामुळे भगदाड पडल्याने जलबोगद्याच्या खर्चापोटी रुपये ७५ कोटी विकासकाकडून अद्याप महानगरपालिकेने वसूल केले नसल्याची बाब दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जलबोगदा दुरुस्ती कालावधीदरम्यान ३० दिवसांकरीता मुंबई मध्ये सुमारे १५ टक्के पाणी कपात करण्यात आली होती तसेच जलबोगद्याला तडा गेल्यामुळे वाया गेलेले पाणी व दुरुस्ती खर्चाची रक्कम विकासकाकडून वसूल करणेबाबत महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकाकडून जलबोगदा दुरुस्तीचा खर्च व त्यावरील दंडात्मक रक्कमेची वसूलीअद्याप न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विकासकाकडून जलबोगदा दुरुस्ती खर्चाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर जलबोगद्यास झालेल्या हानीमुळे वाया गेलेल्या पाण्याचे नुकसानापोटी रुपये १,०५,५४,४००/- व जल बोगदा दुरुस्तीस आलेला खर्च रुपये १३,८४,३१,७००/- असे एकूण रुपये १४,८९,८६,१००/- व त्यावरील बृहन्मुंबई महानगरपालिका जल आकार नियमावलीनुसार ४००% दंडात्मक रक्कम असे एकूण रुपये ७४,४९,३०,५००/- इतकी रक्कम संबंधित विकासकाकडून वसूल करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०५/०४/२०२३ व दिनांक ०६/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक नियोजन प्राधिकरण असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना कळविण्यात आले आहे. तथापि, सदर नुकसानीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जबाबदार नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

त्यानुसार सदर प्रकरणी सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करण्यात येत असून, त्याप्रमाणे खर्च वसूल करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील उद्योजकांकडून नदी पात्रात दूषित पाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(५५)** * **२२७०२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात विशेषत: वर्धा जिल्ह्यातील कारंजा, वर्धा, देवळीत, हिंगणघाट, समुद्रपूर मधील उद्योजकांनी नदी पात्रात व नाल्यांमध्ये दूषित रासायनिक विषारी पाणी सोडल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून पर्यावरण सुरक्षा कायदा, १९८६ अन्वये उद्योजकांना नोटीस पाठविण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पर्जन्यमान कमी झाल्यामुळे काही जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असतानाही प्रदूषित विषारी पाणी नदीपात्रात सोडल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून रासायनिक पाणी नदीपात्रात सोडल्याप्रकरणी किती उद्योजकांना नोटीस पाठविण्यात आल्या, किती उद्योजकांवर कारवाई केली तसेच पर्यावरण कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीस पाठविण्याव्यतिरिक्त कोणतीही कारवाई उद्योजकांवर करण्यात येत नसल्याने अशा घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रासायनिक विषारी पाणी नदीपात्रात सोडल्याप्रकरणी नोटीस पाठविण्यात आलेल्या उद्योजकांवर गुन्हे दाखल करुन स्थानिकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार माहे जानेवारी, २०२३ ते नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागात दूषित पाण्याविषयी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद वर्धा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याबाबतची तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १३/०४/२०२३ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आळढून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे. इव्होनीत व्हल्यु स्टील लिमिटेड, (पुर्वाश्रमीचे मे.उत्तम व्हल्यु स्टील लिमिटेड) या उद्योगाना दिनांक २५/०५/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. तसेच सदर उद्योगाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२३ रोजी पुन्हा प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३/११/२०२३ रोजी पाहणी करण्यात आली असून दिनांक ०४/१२/२०२३ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील कामवरी नदी पात्रात रसायनयुक्त पाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(५६)** * **२२३३० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील कामवरी नदी किनारी वसलेल्या शेलार ग्रामपंचायत हद्दीत अनधिकृतपणे डाईंगचे कारखाने सुरू असून कापडावर रंगप्रक्रिया केलेले रसायनयुक्त पाणी नदीपात्रात सोडल्यामुळे कामवरी नदी प्रदूषित झाल्याने तेथील स्थानिक नागरिकांना खोकला, श्वसनाचा त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृतपणे सुरू असलेल्या डाईंगच्या कारखान्यांसाठी महानगरपालिका हद्दीतील नळ पाणी योजनेतून पाण्याची चोरी करून टँकर माफियांकडून पाण्याचा साठा पुरविण्यात येत असून त्यांच्याकडे कागदपत्र नसतानाही टँकर चालविले जात असल्याने त्याबाबत ठाणे प्रादेशिक कार्यालयाकडून तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रंगप्रक्रिया केलेले रसायनयुक्त पाणी नदीपात्रात सोडणाऱ्या संबंधित कारखान्यांवर तसेच टँकर माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) मौजे शेलार गावाच्या परिसरात कापडावर प्रक्रिया करणारे एकूण २२ उद्योग असून त्यापैकी ९ उद्योग बंद आहेत. उर्वरित १३ उद्योगांपैकी ६ उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतले असून ७ उद्योगांनी संमतीपत्र घेतले नाही. त्यामुळे सदर ७ उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नोटीसा देण्यात आल्या असून नियमानूसार पुढील कारवाई सुरू आहे.

सदर उद्योगांनी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता प्रक्रिया यंत्रणा बसविली असून औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येऊन प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याचा काही प्रमाणात पुनर्वापर करण्यात येतो व उर्वरित प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी कामवरी नदीच्या खारे पाणी क्षेत्रात विसर्जीत करण्यात येते.

आरोग्य अधिकारी, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका व गटविकास अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार तेथील स्थानिक नागरीकांना खोकला किंवा श्वसनाचा त्रास होत असल्याची तक्रार त्याच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सच्या गैरवापराबाबत

**(५७) * २१९५० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., महालक्ष्मी रेसकोर्स यांचेकडून करावयाच्या भाडे वसूलीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये हमीपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले असतानाही आजतागायत सदरहू क्लबकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याची बाब दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संस्थेशी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महालक्ष्मी रेसकोर्स चालविण्यासंदर्भात केलेला करार सन २०१३ मध्ये संपला असतानाही शासनाने यासंदर्भातील सर्वकष धोरण न आखल्याने आजमितीस महालक्ष्मी रेसकोर्सचा ताबा सदरहू संस्थेकडेच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ०७/०६/२००७ च्या शासन आदेशान्वये बृहन्मुबई महानगरपालिकेमार्फत भाडे तत्वावर दिलेल्या मालमत्तांची थकीत रकमांची वसूली जुन्याच दराने केल्यामुळे महानगरपालिकेस तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महालक्ष्मी रेसकोर्सवर सदरहू संस्थेकडून अनेक प्रकारची बेकायदा बांधकामे करण्यात आली असून सदरहू संस्थेकडून कराराचा भंग करून विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम, सोहळे यांचे बेकायदेशीररित्या आयोजन करून करोडो रुपयांचे उत्पन्न घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेशी करण्यात आलेल्या कराराचा भंग करून महालक्ष्मी रेसकोर्सवर अनधिकृतरित्या वापर करणाऱ्या मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. या संस्थेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., यांचेकडून दिनांक १४/०३/२०२३ रोजी सदरचे हमीपत्र नोंदणीकृत करुन दिनांक ०४/०६/२०१२ ते दिनांक ३१/०५/२०२३ पर्यंतच्या कालावधीचे भुईभाडे रुपये ६,७५,६२,०८०/- (सहा कोटी पंच्चाहत्तर लाख बासष्ट हजार ऐंशी रुपये) महानगरपालिकेस भूभाड्या पोटी भरणा केलेले आहेत.
(२) महालक्ष्मी रेसकोर्स येथील भूभागाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब यांचेकडून हमीपत्र घेण्यात आले असून त्यानुसार भाडेपट्ट्याच्या नवीन धोरणानुसार देय असणारी संभाव्य भाडेपट्ट्याच्या फरकाची रक्कम व्याजासह घेण्यात येणार आहे.

(४) महालक्ष्मी रेसकोर्स या भूभागावर, शासकीय संस्था, सामाजिक संस्था, वाणिज्यिक संस्था यांचेकडून भूभागावर कार्यक्रम करण्याकरीता प्राप्त विनंती अर्जाच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त यांची परवानगी प्राप्त करुन कार्यक्रम करण्यास आयोजकाला परवानगी दिली जाते. सदर भूभागावर आयोजित होणाऱ्या केवळ वाणिज्यिक कार्यक्रमांकरीता दिनांक ०१/०५/२०२२ पासून १५,००,०००/- इतकी ठोक रक्कम व त्यापुढे प्रत्येक वर्षी त्यात ५% वाढ करुन शुल्क आकारणी केली जाते. सन २०१३ पासून आजमितीपर्यंत एकूण ६४ कार्यक्रमांना महानगपालिकेकडून परवानगी देण्यात आलेली असून, त्यापैकी केवळ वाणिज्यिक कार्यक्रमांमधून रुपये ५,६१,८९,९१०/- इतके शुल्क महानगरपालिकेच्या ‘जी / दक्षिण’ विभाग कार्यालयाकडून वसूल करण्यात आलेले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्या प्रदुषण मुक्त करुन नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(५८) * २११७४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सन २०२२-२०२३ च्या अहवालानुसार अतिप्रदुषणाने नदयांची परिस्थिती गंभीर होत असून, राज्यातील ५५ नदयांची खोरी नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक तापमान वाढीमुळे पाऊस दिवसेंदिवस कमी होत असून, मानवनिर्मित प्रदूषणामुळे नदयांची खोरी नामशेष होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील नद्या प्रदुषण मुक्त करुन नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) मा.लवादाने दिलेल्या निर्देशांनुसार शासनाने दिनांक १३/१२/२०१८ रोजी नदी पुनरूत्थान समिती गठीत करण्यात आली असून मा.हरित लवाद यांच्या निर्देशांनुसार सदर समितीमार्फत राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.

- मा.हरित लवादाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रदूषित नदी पट्ट्यांमध्ये प्रदूषण रोखण्याकरीता स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाची स्थापना प्रदूषित पट्टे असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे.

- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रक्कमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या व विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कलम २४, २५, २६, सोबत ४३, ४४ जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत खटला दाखल करणेबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत.
- वाढते नागरीकरण व औद्योगिकरणामुळे होणाऱ्या नद्यांचे प्रदूषण रोखणे व राज्यातील जलस्त्रोत अबाधित ठेवणे व त्यांचे संवर्धन करणे, नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करुन नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी दिनांक ०१/०३/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य नदी संवर्धन योजना सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने यांत्रिकी झाडू खरेदी केल्याबाबत

**(५९) * २१९३८ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दिवसेंदिवस ढासळत असणाऱ्या हवेची गुणवत्ता वाढवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शहर आणि उपनगरांतील प्रमुख रस्त्यांची पहाटेच्या वेळी स्वच्छता करण्यासाठी ई-शिपिंग तंत्रज्ञानाचे यांत्रिकी झाडू खरेदी करण्यात येणार असून देशात प्रथमच या झाडूंचा वापर होणार असल्याचा दावा बृहन्मुंबई महानगरपालिकेने केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने रुपये ४० ते ५० लाख खर्च करून यांत्रिकी झाडू खरेदी केले असून या यांत्रिकी झाडूची देखभाल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कंत्राटदारांवर रुपये ७ कोटींचा खर्च केला असून कंत्राटदारास सात वर्षांसाठी हे कंत्राट देण्यात येणार असून त्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहेत काय,

(३) असल्यास, पर्यावरण वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्वच्छता कार्यक्रमांतर्गत पंचवार्षिक कार्यक्रमाच्या निधीतून बृहन्मुंबई महानगरपालिकेने दोन यांत्रिकी झाडूच्या खरेदीनंतर एक वर्षासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करणे, देखभालीसाठी सात कोटी खर्च करणे यापेक्षा नवीन झाडू खरेदी करणे सोयीस्कर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यांत्रिकी झाडूच्या देखभालीसाठी रुपये ७ कोटी खर्च करुन कंत्राटदारासोबत सात वर्षाचा करार करण्याची कारणे काय आहेत,

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व(४) पर्यावरण वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्वच्छता कार्यक्रम या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या निधीतून बृहन्मुंबई महानगरपालिकेने २ नग यांत्रिकी झाडू संयंत्रे खरेदी करुन त्यांचे एक वर्षाकरीता प्रचालन व परिरक्षणाचे कंत्राट देण्यात आले होते. अशा प्रकारच्या तंत्रज्ञानयुक्त सयंत्रांचे प्रचालन व परिरक्षण करण्याकरीता कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे सदर काम कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे.

सदर काम दैनंदिन अत्यावश्यक असल्यामुळे तसेच आर.टी.ओ. नॉर्म्सनुसार सदर यांत्रिकी झाडू संयंत्रांच्या पुढील उपयुक्त कालावधीसाठी कंत्राटदार नेमणे आवश्यक असल्यामुळे सदर २ नग यांत्रिकी झाडू संयंत्रांच्या सात वर्षांच्या प्रचालन व परिरक्षण कालावधीच्या कामाकरीता स्थानिक वृत्तपत्रांतून सार्वजनिक जाहिरातीद्वारे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर निविदा सूचना देऊन निविदा मागविण्यात आल्या व त्याअनुषंगाने लघुत्तम प्रतिसादात्मक निविदाकारास पुढील सात वर्षांकरीता प्रचालन व परिरक्षणाच्या कामाकरीता रुपये ७.०२ कोटी इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे.

सदर २ नग यांत्रिकी झाडू संयंत्रांच्या प्रचालन व परिरक्षणाच्या खर्चामध्ये परिरक्षणाचा खर्च प्रचालन खर्चाच्या केवळ १०% आहे. दरवर्षी नवीन यांत्रिक झाडू खरेदी केले तरी प्रचालन खर्च हा करावाच लागणार असल्याने नवीन यांत्रिकी झाडू खरेदी करणे सोयीस्कर होणार नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत सिध्दार्थ नगर येथील बायोगॅस प्रकल्पातील सांडपाणी प्रक्रियेविना नाल्यात सोडल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरल्याबाबत

**(६०) * २२५९४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेतील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी होम बाबा टेकडी सिद्धार्थनगर येथे उभारण्यात आलेल्या बायोगॅस प्रकल्पातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता नाल्यात सोडले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी प्रक्रिया न करता नाल्यात सोडल्यामुळे पत्री पूल, हनुमान नगर, कृष्णा नगर भागात मोठ्या प्रमाणात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बायोगॅस प्रकल्प आर्यन ॲण्ड असोसिएट या कंपनीच्या माध्यमातून चालविला जात असून महानगरपालिकेने प्रकल्पासाठीच्या घातलेल्या अटींचे कंपनीने उल्लंघन करत प्रकल्पामधून निघणारे सांडपाणी नाल्यात सोडले जात असल्यामुळे तेथील डोंगराच्या पायथ्याशी असलेले गोड्या पाण्याचे स्त्रोत देखील दूषित झाले असून पूर्वी या भागातील नागरिक या स्त्रोतातून येणारा पाण्याचा वापर पिण्यासाठी करीत होते हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दूषित पाणी प्रक्रिया करून नाल्यात सोडण्यात यावे किंवा टँकरमध्ये भरून अन्यत्र ठिकाणी टाकण्यात यावे अशी मागणी परिसरातील नागरीकांनी वारंवार महानगरपालिका प्रशासनाने या मागणीची कोणत्याही प्रकारे दखल घेतली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेमधील बायोगॅस प्रकल्पातील सांडपाणी नाल्यात सोडणाऱ्या ठेकेदाराविरोधात कोणती कारवाई करणार केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची तक्रार महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाली, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदरचा प्रकल्प सांडपाणी प्रक्रिया केंद्र नसून, बायोगॅस निर्मितीचा प्रकल्प आहे.

- सदर प्रकल्प ४ वर्षापासून कार्यरत असून, डायझेस्टर मध्ये १ ते २ वेळा कचरा अडकल्याने, प्लान्टच्या साफसफाईसाठी वापरण्यात आलेले पाणी बाहेर पडले, ही वस्तुस्थिती आहे.

- सदरची बाब पुन्हा होऊ नये म्हणून प्लान्टमध्ये काही तांत्रिक दुरूस्ती करणे आवश्यक होते. त्यानुसार तांत्रिक दुरूस्तीचे काम तातडीने हाती घेऊन प्लान्टमध्ये साफसफाईसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्यासाठी सोकपीट तयार करून सदरच्या पाण्याचा बायोगॅस प्रक्रियेमध्ये पुनर्वापर करण्यात येत आहे.
- दरम्यानच्या काळात बायोगॅस प्रकल्पामधून बाहेर पडलेल्या पाण्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्लान्टमधील साफसफाईसाठी वापरलेले पाणी पुनश्च: बाहेर पडणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिलांसाठी सार्वजनिक शौचालय उपलब्ध करुन देणेबाबत

**(६१) * २२६६६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत महिलांच्या सार्वजनिक शौचालयाचा प्रश्न प्रलंबित असल्याने अनेक चाकरमानी महिलांचे आरोग्य धोक्यात आले असून सामाजिक संस्थांनी प्रकाशित केलेल्या अहवालानुसार महिलांसाठी असलेली सार्वजनिक शौचालय अपूर्ण व नादुरुत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई येथील सार्वजनिक शौचालयात प्रशासनाकडून सर्व सेवासुविधा विनाशुल्क पुरविणे क्रमप्राप्त असतानाही सार्वजनिक शौचालय व्यस्थापनाकडून पैसे आकारणे, वसुली करणे इ. सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषत: मुंबई शहरातील व झोपडपट्टी वसाहतीमध्ये सार्वजनिक शौचालयाची संख्या वाढवून स्वच्छता व इतर सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता इतर उपक्रम राबविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यभरातील महिलांसाठी शहरातील बस, रेल्वे स्थानक व इतर ठिकाणी सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढवून सदर शौचालय विनाशुल्क व अद्ययावत सोई सुविधेसह उपलब्ध करुन शौचालयाचे व्यवस्थापन महिलांकडून करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गलिच्छ वस्तीमधील सार्वजनिक शौचालयाच्या वापरासाठी कौटुंबिक मासिक पासाकरीता रुपये १००/- आकारले जातात. तसेच "पैसे द्या व वापरा" या तत्वावर बांधण्यात आलेल्या सर्व सार्वजनिक शौचालयामध्ये शौचाच्या वापरासाठी रुपये २/- (महिला व पुरुष) इतके शुल्क आकारले जाते व मुतारीची सोय विनाशुल्क पुरविण्यात येते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक शौचालयामध्ये महिलांसाठी स्वतंत्र सामुदायिक व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच लॉट-१२ अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्व व पश्चिम उपनगरे आणि शहर विभागातील अस्तित्वात असलेल्या ५५९ सामुदायिक ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या ८५५८ सामुदायिक शौचकुपांची संख्या १४,१६६ पर्यंत वाढविण्यात येत असून, सदर शौचालयांच्या पुनर्बांधणीकरीता २८ निविदा मागविण्यात आल्या आहेत व नियुक्त कंत्राटदारांस कार्यादेश देण्यात आले आहेत.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ८२६६ शौचालयांतर्गत महिलांसाठी एकूण ३८,८६९ शौचकुपे उपलब्ध करण्यात आलेली आहेत. तसेच रेल्वे व बस स्थानकाजवळ, बाजार इ. ठिकाणी सार्वजनिक-खाजगी भागिदारीद्वारे अशासकीय संस्थांच्या समन्वयाने आवश्यकतेनुसार व लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जागेच्या उपलब्धतेप्रमाणे स्वच्छतागृहे बांधण्यात येतात. सदर स्वच्छतागृहांची देखभाल व दुरुस्तीकरीता ते संबंधित संस्थांना चालविण्यास देण्यात येतात. शहरातील बस, रेल्वे स्थानक व इतर ठिकाणी सार्वजनिक शौचालयांच्या दैनंदिन साफसफाईकरीता लागणारे द्रव्य (फिनाईल), मासिक वीज व पाणी देयके, मनुष्यबळ खर्च, प्रशासकीय खर्च इ. बाबी असल्यामुळे शौचालयांची सुविधा विनाशुल्क करणे संयुक्तिक होणार नाही.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यात एकूण १,०४,९५४ सीट्स सामुदायिक शौचालये तर एकूण ५५,३६३ सीट्स सार्वजनिक शौचालये बांधण्यात आले आहेत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत राज्यात शहर स्वच्छता कृती आराखड्यानुसार एकूण ४२९२ सार्वजनिक शौचालये, १६९०५ सामुदायिक शौचालये व ३२३८ आकांक्षी शौचालये बांधण्याचे नियोजित आहे.

सार्वजनिक शौचालयाचे व्यवस्थापन करण्याबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत निर्णय घेण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.